म. ग्रं. सं. ठाणें

विषय

सन

लेखक वामन ...

संग्रहालय क्रमांक ४८३

पुस्तकाचें नांव नामदार बाबु सुरेन्द्रनाथ बानर्जी

# चरित्र

आजकालचीं थोर माणसें.

# नामदार बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी.

( पुणें येथें भरलेल्या अकराव्या राष्ट्रीयसभेचे मान्यवर अध्यक्ष )

यांचें हें लहानसें चरित्र.

वामन बाळकृष्ण रानडे, 'ज्ञानचक्षू'चे एडिटर,

यांनीं "राष्ट्रसभासमाचारा"मध्यें प्रसिद्ध केलें होतें

तें एकत्र करून,

पुस्तकरूपानें प्रसिद्ध केलें आहे.

---

( सर्व हक्क राखून ठेवले आहेत. )

[ पुस्तकाच्या विक्रीनें उत्पन्न होणाऱ्या पैशांतून पुस्तकाचे छपाईचा वगैरे खर्च वजा करून बाकीचा पैसा राष्ट्रीयसभेच्या 'कायम फंडा' कडे देण्याचें ठरविलें आहे. ]

---

पुणें

" ज्ञानप्रकाश " छापखान्यांत छापिलें.

शके १ १७ पौष मास.

इ० स० १८ ६ जान्युआरी.

किंमत तीन आणे.

# प्रस्तावना.

।चक्षू " मध्यें " **चरित्रमाला** " प्रसिद्ध होऊं लागल्यापासून एतद्देशीय णसांचीं चरित्रें वाचण्याची आमच्या महाराष्ट्रांतील वाचकांस बरीच रुचि लाग- आहे. व त्यांचे वाचनेपूर्त्यर्थ वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झालेले लेख " **आजका- ासें** " ह्या नांवाच्या पुस्तकमालेनें देशबंधूंस अर्पण करण्याचा निश्चय ह्या मालेंतील हें दुसरें पुष्प पुस्तकरूपानें गोंवण्याचा सुप्रसंग आला आहे. हार वाचकांनीं केल्यास ही माला लवकरच बरीच मोठी होण्याचा संभव महाराष्ट्रीय ग्रंथसंग्राहकांचे कंठांत चांगल्या रीतीनें शोभूं लागेल अशी प्रस्तुतचें चरित्र लिहिण्यास, चरित्रनायकाची स्वतंत्रपणें गांठ घेऊन वर संवाद करून, घेतलेल्या टिपणांचे आधारानें लिहिण्याचे जसे इतर इतांना प्रसंग आले तसा प्रसंग आला नसून, हें चरित्र केवळ इंग्रजी द्वारें लिहिलें असल्यामुळें, यांत इतर प्रसिद्ध झालेल्या चरित्रांतल्या प्रमा- लिहिण्याच्या अनेक गोष्टी लिहितां आल्या नाहींत. तथापि, ज्या गोष्टी वा- त्य कळल्या पाहिजेत त्या बहुतेक सर्व गोष्टी ह्या चरित्रांत दाखल झाल्या हणून हें चरित्र कोणत्याही रीतीनें या पूर्वी प्रसिद्ध झालेल्या चरित्रांपेक्षां याच्या गोष्टींत कमी नाहीं हें वाचकांच्या लक्ष्यांत येईल.

त्या राहणार ..
फलटी
े अ-
े.

स्थळप्रत
म.ग्रं.सं.ठाणे

# अकराव्या राष्ट्रीयसभेचे अध्यक्ष मान्यवर नामदार बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी.

सु-.
त चाल..
ल्चीं
केला
ाच



ग्रंथ संग्रहालय
नं. १२
ठाणे

आमच्या देशाला आलेली अवनति घालवून उन्नति आणण्यास धीर, वीर, विद्वान्, देशाभिमानी, साहसी, वक्ते आणि सुधारणाभक्त असे लोकच उपयोगी पडणार असून, देशांतल्या सर्व भागांत त्यांची समृद्धि झाल्याशिवाय आपल्याला ऊर्जितावस्था व उन्नतस्थिति येण्याचा संभव नाहीं. पृथ्वीवरील सुधारलेल्या देशांची स्थिति पाहिली म्हणजे तेच्या मूळाशीं असल्या वरपुरुषांची अनेक दिशांनीं समृद्धि असल्यावांचून ते देश एवढ्या योग्यतेस आले नाहींत असें आढळून येतें. कारण, देशाचें भाग्य एकाच्याच उद्योगबलावर अवलंबित नसून व त्याला चोहों दिशांनीं त्याच्या तोडीच्या, योग्यतेच्या व समजाच्या महापुरुषांचें साहाय्य व पाठबळ असल्यावांचून त्या धीरवान्, विद्वान्, साहसी व अभिमानी पुरुषाच्या यत्नांत व मेहनतींत जोम व तकवा रहावा तसा राहणार नाहीं; व त्या मानानेंच त्याच्या यत्नाचें फलही दीर्घकाल टिकणारें अथवा सर्वोपयोगी असें अनुभवास येणार नाहीं, हें उघड आहे. राष्ट्रीयसभेचें कार्य अनेक विद्वान्, देशाभिमानी व धीरवान् पुरुषांनीं हातीं घेतलें असून त्या सर्वांच्या समजुतींत व मतांत ऐक्य असल्यामुळें ह्या कार्याची सिद्धि प्रयत्नांतीं सर्वांच्या अनुभवास आल्यावांचून राहणार नाहीं, अशी प्रत्येक राष्ट्रभक्तास उमेद आहे. मात्र कार्यकर्त्या पुरुषांचा भरणा उत्तरोत्तर ज्यास्त ज्यास्त होत जाऊन आणि त्यांचा उत्साह, धैर्य व ऐक्य हीं कायम राहून त्यांच्या यत्नांची सफलता थोडथोडी तरी दिवसेंदिवस चोहों दिशांनीं निदर्शनास आली पाहिजे. कारण, राष्ट्रीयसभेच्या कार्याची सिद्धि सामर्थ्य-

च आहे. हिंदुस्थानच्या राष्ट्रसभेचे कार्यास ज्या अनेक थोर, विद्वान् व अभिमानी पुरुषांचे हात लागले आहेत त्यांमध्येच यंदांच्या पुणें येथील अकराव्या राष्ट्रीयसभेचे अध्यक्षस्थानीं विराजमान होणारे मान्यवर नामदार **बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी** हे एक सच्छील सद्भक्त आहेत. तेव्हां त्या महापुरुषाचें चरित्र ह्या प्रसंगीं लोकांस कळविणें अवश्य असल्यावरून आम्ही तसें करितों.

## कुल, जन्म आणि विद्याभ्यास.

बंगाल्यांतील फरिदपूर परगण्यामध्यें बानर्जी नांवाचें राहरी अथवा कुलीन ब्राम्हणघराणें होतें; त्यांतील बाबू गौर किशोर बानर्जी ह्या नांवाचे एक गृहस्थ कलकत्त्याजवळील मणिरामपूर नांवाच्या गांवीं येऊन राहिले. मणिरामपूर हें गांव बराकपूरच्या रेल्वे स्टेशनापासून थोडेच मैल दूर आहे. बराकपूर हें ठिकाण हिंदुस्थानच्या व्हाइसरायांच्या वसतीचें स्थान आहे. व्हाइसरायांची स्वारी कलकत्त्यास रहात नसून बराकपुरास राहते. कलकत्याहून डाक्याकडे जी रेलवे लाईन जाते त्या लाइनीवर बराकपूर स्टेशन कलकत्त्यापासून थोडे मैलांवर आहे, आणि त्या स्टेशनावर उतरल्यानंतर मणिरामपुरास सडकेच्या रस्त्यानें जातां येतें. ह्या मणिरामपुरांत बाबू गौरकिशोर बानर्जी यांणीं येऊन वस्ती केली. हे गौरकिशोर बानर्जी आमच्या विषयनायकाचे प्रपितामह म्हणजे पणजे होत. यांचे पुत्र बाबू गोलोकचंद्र बानर्जी हे बंगालच्या रेव्हिन्यू बोर्डाकडील मीठ खात्यांत नोकर असून त्या नोकरीचाकरीच्यासंबंधानें ते मणिरामपूर येथें न राहतां कलकत्त्यास राहूं लागले. बाबू गोलोकचंद्र हे फार उदार असून जुन्या प्रकारचे मोठे स्वधर्मनिष्ठ असत. गरीब लोकांचा समाचार घेऊन ते त्यांना हरप्रसंगीं दानधर्म करीत आणि आपले जे अनाश्रित व गरीब मित्र किंवा आप्तस्वकीय असत त्यांना आश्रय देऊन त्यांच्या स्वास्थ्याकडे ते नेहमीं लक्ष्य देत; अशी त्यांची ख्याति असे. हे बाबू गोलोकचंद्र आमच्या विषयनायकाचे पितामह असून त्यांचे पुत्र डाक्तर दुर्गाचरण हे आमच्या विषयनायकांचे पूज्य वडील होत. बाबू दुर्गाचरण बानर्जी यांचें जन्म मणिरामपुर येथें १८१९ सालीं झालें व त्यांणीं कलकत्त्याच्या हिंदु कालेज नामक पाठशाळेमध्यें अभ्यास करून मोठा लौकिक संपादन केला. हे कलकत्त्यास मोठे नामांकित व यशस्वी डाक्टर होते. ते प्रवीण शस्त्रवैद्य, उत्कृष्ठ चिकित्सक आणि दयाळू भिषग्वर्य होते. कलकत्त्यास तर त्यांना "सृष्टीचे वैद्य" ( Nature's Doctor ) असें म्हणत असत. बाबू दुर्गाचरण बानर्जी याची बुद्धि फारच विशाळ असून ते पाठशाळेंत शिकत असतांच ती त्यांचे गुरूपगुरूंच्या आणि सहाध्यायी मित्रमंडळीच्या अनुभवास आली होती. आणि त्या बुद्धिमत्तेचें पारितोषिक त्यांस त्यांच्याच पाठशाळेंतील विद्यार्थीवर्गेंत वारंवार मिळत गेलें. म्हणजे, पाठशाळेंतलीं सर्व बक्षिसें बाबू दुर्गाचरण बानर्जी यांणीं मिळवून आपल्या सहाध्यायींमध्यें अग्रमान मिळविला, असा त्यांचा लौकिक आहे. बाबू दुर्गाचरण बानर्जी यांचे अभ्यासक्रमाची पद्धति फारच विलक्षण होती असें सांगतात. त्यांचें पाठशाळेंतील क्रमिक अभ्यासांकडे तादृश लक्ष्य नसून, त्यांणीं घरीं इतर अनेक विषयांचे ग्रंथ वाचून त्यांचें ज्ञान संपादन करावें; आणि परीक्षेच्या वेळीं मात्र पाठशाळेंतील क्रमिक अभ्यासांना एकदां आवृत्ति देऊन परीक्षेस बसावें कीं. त्यांचा

आपला त्यांचे सर्व सहाध्यायींवर नंबर ठेवलेला. आणि वर्ष वर्ष ज्यांणीं अभ्यासावरच घोकंपट्टी केली ते बिचारे दुर्गाचरण बाबूंच्या खालच्या नंबरास यावे! असा प्रकार नेहमीं अनुभवास येत असे. बाबू दुर्गाचरण बानर्जी यांचें वाचन फार मोठें असून इतिहास आणि तत्वशास्त्र हे विषय त्यांच्या फार आवडीचे असत. कालेजांतले अभ्यास संपल्यावर ते कांहीं दिवस कलकत्याच्या डेव्हिडहेअर स्कूलमध्यें शिक्षकाचे कामावर असून नंतर ते फोर्ट वुइल्यम कालेजांत क्लार्कच्या जागीं नेमले गेले.

बाबू दुर्गाचरण बानर्जी यांस डाक्टरी शिकून वैद्यकीचें व शस्त्रक्रियेचें ज्ञान संपादन करण्याची स्फूर्ति एका विशेष कारणानें झाली. तें कारण असें:—त्यांचे कुटुंबांतलें एक मनुष्य पटकीच्या उपद्रवानें एकाएकीं आणि फारच तडकाफडकीं वारलें. तें पाहून त्यांना औषधिशास्त्रासंबंधी ज्ञानसंपादनाची बलवत्तर इच्छा उत्पन्न होऊन, त्यांणीं वैद्यकाचे ग्रंथ वाचण्यास सुरुवात केली. अनेक ग्रंथ वाचण्याची पहिल्यापासूनच त्यांना अतोनात आवड असल्यामुळें नानाविषयांवरील शास्त्रीय ग्रंथ वाचून त्यांणीं विविधशास्त्रीय विषयांशीं आपला परिचय केला होता. व त्यामुळें त्यांना कोणताही शास्त्रीय विषय हस्तगत करून घेण्यास तादृश कठिण वाटत नसे. असो. वरील कारणानें त्यांना वैद्यशास्त्राची माहिती करून घेण्याची इच्छा झाल्यावर त्यांणीं डाक्तरीचे सर्व ग्रंथ मिळवून मेडिकल कालेजांत डाक्तरीचा अभ्यास सुरू केला; आणि त्यांच्या नैसर्गिक बुद्धिचापल्यानें त्यांणीं कालेजांत होणाऱ्या सर्व विषयांचें ज्ञान लवकरच पूर्णपणें संपादन करून, पुढें डाक्तरीची परीक्षा देऊन पदवी मिळविण्यास एकंदर पांच वर्षांची मुदत कालेजांत रखडत काढावी लागणार असल्यामुळें, त्यांणीं परीक्षेचा व पदवी मिळविण्याचा नाद मुळींच सोडून देऊन, वैद्यकीचा धंदा चालू केला; व ते लवकरच कलकत्यांतील नामांकित डाक्टर बनले. डा. दुर्गाचरण बानर्जी यांच्या बुद्धिमत्तेला त्यांचा हा उशीरां संपादन केलेला डाक्तरीचा धंदा मोठा व विशेषच भूषणावह झाला. डाक्टर दुर्गाचरण बानर्जी हे पटकीच्या आजारावर फारच वस्ताद डाक्टर असल्याची कलकत्यांत सुप्रसिद्धि होती. कलकत्याचे प्रसिद्ध व्यापारी मेसर्स जार्डिन, स्किन्नर आणि कंपनी यांचेकडील एक कामगार आणि कलकत्ता शहरांतील एक प्रमुख व लोकप्रिय गृहस्थ बाबू नीलकमल बानर्जी यांस एकदां इतका भयंकर पटकीचा उपद्रव झाला कीं, त्या आजारांतून ते वांचतील असें कोणासही वाटलें नाहीं. कलकत्यांतील सर्व देशी व युरोपियन डाक्टर आणि तसेच देशी जुने वैद्य व हकीम यांणीं हात टेंकले, व त्यांच्या त्या भयंकर आजारांतून त्यांस मुक्त करण्यास कोणीही समर्थ होईल अशी कोणाच्यानेंच खात्री होईना. पण बाबू नीलकमल बानर्जी यांचे सुदैवानें त्यांच्या त्या भयप्रद स्थितींत डा० दुर्गाचरण बानर्जी हे त्यांस मिळून त्यांच्या उपचारानें ते त्या जीवावरील आजारांतून मोठ्या बाणीनें वांचले. व त्याबद्दलचें सर्व यश डाक्तर दुर्गाचरण बानर्जी यांसच होतें असें सर्व कलकत्ता शहरांत लोक बोलूं लागले. डा० बानर्जी हे कोणत्याही रोगाची चिकित्सा म्हणजे परीक्षण किंवा निदान करण्यांत फारच मार्मिक असल्याची त्यांची ख्याति होती. आणि रोग्याचें एकंदर जीवन तर केवळ ह्या शुद्ध व बिनचूक चिकित्से.

यरच असतें. रामबाण व गुणकारी औषधें
प्रत्येक रोगावर अनेक आहेत; परंतु तीं
औषधियोजना, चिकित्सा बरोबर आणि
बिनचूक झाल्याशिवाय करण्यानें रोग्याला क-
दापि आरोग्यप्राप्ति होण्याचा संभव नसतो
हें उघड आहे. डाक्तर किंवा वैद्य यांचें
यश व चांगुलपण सर्वांशीं चिकित्सेवर म्ह
णजे रोगपरीक्षणावरच केवळ अवलंबून अ
सल्यामुळें व तसें रोगपरीक्षण ज्याला असेल
त्यालाच चिकित्सक किंवा वैद्य ही संज्ञा अ
सल्यामुळें बाबू दुर्गाचरण बानर्जी हे डाक्त
किंवा वैद्य म्हणविण्यास अगदीं योग्य व पा
होते, असें कलकत्त्यास त्यांचे काळीं सर्व लो
म्हणत असत. पुण्यांत कै० बापूसाहेब मेहेंद
हे जसे खरे चिकित्सक म्हणून प्रसिद्ध हो
त्याप्रमाणें डा. दुर्गाचरण हे कलकत्ता प्र
तांत उत्कृष्ट चिकित्सक म्हणजे रोगप
क्षक म्हणून प्रसिद्ध होते. व त्यामुळें त्यां
घरीं नेहमीं रोग्यांची अतिशय दाटी अ
लेली दृष्टीस पडे. डा. दुर्गाचरण बान
यांच्याकडून आपल्या रोगाचें निदान क
रून त्यांच्या योजनेप्रमाणें औषध सेवन क
ण्याची इच्छा देशी किंवा युरोपिय-
श्रीमंत किंवा गरीब, विद्वान् कि
अडाणी आणि स्त्री अथवा पुरुष
चेमध्यें व सर्व जातिधर्मांत एक सारखी अ
इतकेंच नव्हे; तर दूरवरच्या रोग्य
असें वाटे कीं, आपण डा. बानर्जी य
संनिध एकदां गेलों कीं, आपल्याला
गुण पडला असें होईल. अशा प्रकार
च्या वैद्यावर किंवा डाक्तरावर रोग्याची नि
असेल त्याच्या गुणाबद्दल व यशाविष
आणखी ज्यास्त विवेचन तें काय करावय
आहे? त्याचें आतां कारणच नाहीं. ज्या एत
शीय गरीब लोकांस मोठमोठ्या फिया भर
गोरे डाक्टर अथवा तशा प्रकारचे इ

देशी डाक्टर व वैद्य बालवून त्या सर्वांच्या
मतानें चिकित्सा करविण्याचें सामर्थ्य नसे
त्यांना असें वाटत असे कीं, आपल्याला डा०
दुर्गाचरण बानर्जी यांनीं पाहून रोगचिकित्सा
केली म्हणजे मानवी शक्तीमध्यें परीक्षणाचें
जेवढें म्हणून सामर्थ्य आहे तेवढें
आपल्याला मिळालें. डा० दुर्गाचरण
हे जसे लोकोत्तर यशस्वी डाक्टर
असत तसेंच त्यांच्यामध्यें औदार्य आणि
दया हेही गुण अत्यंत प्रशंसनीय होते. व
त्या त्यांच्या दोन्ही गुणांचा लाभ कलकत्त्यां-
तील शेकडों गरीब व विपद्ग्रस्त लोकांस
मिळून त्यांणीं त्यांस नेहमीं दुवा व आशी-
र्वाद देत असावें. हे डा० दुर्गाचरण बा-
नर्जी १८७० सालच्या फेब्रुवारी महिन्यांत मरण
पावले. त्यांच्या मृत्युसंबंधानें त्या वेळच्या कल-
कत्ता येथील देशी व इंग्रजी पत्रांतून फारच
दुःख प्रदर्शक लेख प्रसिद्ध झालेले आहेत.

ह्या डाक्टर दुर्गाचरण बानर्जी-
च्या पांच पुत्रांतील आमचे विषयनायक
हे द्वितीय पुत्र होत. बाबू
सुरेंद्रनाथ बानर्जी यांचें जन्म कलकत्ता
येथें १८४८ च्या नोवेंबर महिन्यांत झालें.
बाबू सुरेंद्रनाथ यांची बुद्धि आणि ज्ञानसंपाद-
नेच्छा त्यांच्या प्रिय व पूज्य पित्यासारखी-
च फार प्रखर असून, तत्संबंधाचा अनुभव
पुढें हळू हळू सर्वांस येऊं लागला.

सुरेंद्रनाथ बाबू लहानपणीं पातुलडंगनामक
कलकत्त्याच्या एका भागांतील पाठशाळेंत जा-
ऊन शिकूं लागले; व तेथें त्यांणीं बंगाली
भाषेतील प्राथमिक शिक्षण व हिशेबठिशेब
शिकून घेतले. आणि वयाच्या सातव्या
वर्षी ते डव्हूटन् कॉलेज नांवाच्या
पाठशाळेंत प्रविष्ट होऊन पुढील अभ्यास
करूं लागले. ते पहिल्यापासूनच मोठे मे-
हनती, तत्पर व सक्त अभ्यासी होते. ड-

न्हूटन् कालेजांत हल्लींप्रमाणेंच त्या वेळीं-ही बहुतेककरून युरोपियन व युरेशियन मुलें-च फार असत. आणि सुरेंद्रनाथ जेव्हां त्या शाळेंत गेले तेव्हां ते नुक्तेच इंग्रजी वर्ण-मालेचीं २६ अक्षरें मात्र शिकले होते; त्यापेक्षां त्यांस इंग्रजी भाषेचें ज्ञान कांहींएक नव्हतें.

सुरेंद्रनाथ बाबू शाळेंत शिकत असतां त्यांना घरीं खाजगी रीतीनें शिकण्यासाठीं शिक्षक वगैरे कांहीं एक व कधींही ठेवण्या-चें कारण पडलें नाहीं. मात्र त्यांचे कुटुंबांत-च एक विद्यार्थी राहत होता, त्याला सुरेंद्र-नाथांनीं कधीं कधीं आपल्याला अडलेले किंवा न समजलेलें वाक्य विचारून समजून घ्यावें. तथापि, सुरेंद्रनाथ यांणीं इंग्रजी भा-षेमध्यें जी आपली गति करून घेतली ती, त्या भाषेचें व्याकरण व कोश वगैरेंच्या सा-धनांपेक्षां आपल्या इंग्रजी व युरेशियन सहा-ध्यायींच्या सहवासानें व त्यांच्या बरोबर नेहमीं बोलण्याचा परिपाठ ठेवूनच संपादन केली, असें त्यांच्या बरोबरीचे सहाध्यायी सांगतात. त्यांची म्याट्रिक्युलेशन परीक्षा १८६३ सालीं पास झाली. त्या वेळीं त्यांचें भाषाविषयक ग्रांथिकज्ञान म्ह-टलें म्हणजे, लेनीचें व्याकरण, व त्याच-प्रमाणें हायलीच्या व्याकरणाशीं बेताबाताचा परिचय, ह्यापेक्षां अधिक नव्हतें. ते म्याट्रि-क्युलेशन परीक्षेंत पहिल्या भागामध्यें आले व त्या परीक्षेला त्यांणीं ल्याटिन ही दुसरी भाषा घेतली होती. ह्या परीक्षेंत ते बरेच वर आल्यामुळें त्यांना एक स्कॉलर्शिप मि-ळाली. पुढें दोन वर्षांनीं ते लिटल्गोच्या परीक्षेंतही उत्तम रीतीनें पास होऊन त्यांना वरच्या प्रतीची स्कॉलर्शिप मिळाली. आणि १८६८ सालीं ते बी. ए. परीक्षेंत दुसऱ्या वर्गांत पास झाले. बी. ए. च्या परीक्षेपर्यंत ते पूर्वींच्या दोन्ही परीक्षांत पुष्कळ वर येऊन याच परीक्षेंत ते खालच्या वर्गांत उतरण्याचें कारण असें झालें कीं, परीक्षेच्या पूर्वीं ते दोन वेळां दोषी ज्वरानें फार आजा-री झाल्यामुळें त्यांच्यानें, जितका झटून अ-भ्यास व्हावयास पाहिजे होता तितका झटून करवला नाहीं. बी. ए. परीक्षेपर्यंत त्यांणीं दुसरी भाषा ल्याटिनच घेतली होती.

## सिव्हिल सर्व्हिस परीक्षेसाठीं त्यांचें विलायतेस प्रयाण.

बाबू सुरेंद्रनाथ यांणीं बी. ए. पदवी मिळविली त्या वेळीं डव्हूटन् कालेजावर मि. साइम हे प्रिन्सिपाल होते. हे मि. साइम पुढें पंजाबांतील शाळाखात्यांत इन्स्पेक्टर-च्या जागीं गेले होते. त्या साइम साहेबांनीं सुरेंद्रनाथांस सुचविलें कीं, तुमचें वय बेताचें आहे; ह्यासाठीं तुम्ही विलायतेस जाऊन सिव्हिलसर्व्हिस परीक्षा देण्याचा विचार केल्यास त्यांत तुम्हाला यश मिळेल. पहिल्या-पासून सुरेंद्रनाथ बाबूंच्या बुद्धिमत्तेवर प्रिन्सि-पाल साइम हे फारच खुष असून त्यांना मोठा आनंद वाटे. तसेंच, त्यांना सुरेंद्रनाथ यांची हुशारी, भाषानैपुण्य व नैसर्गिक चांचल्य हीं बघून असें वाटे कीं, हा तरुण मुलगा पुढें कांहीं तरी अद्वितीय व विलक्षण कर्तबगारीचा निपजेल. आणि तें त्यांचें भविष्य पुढें खरें झाल्याचें अनुभवास आलें-च. प्रो० साइम् यांच्या सांगण्यावरून सुरेंद्र-नाथ बाबूंच्याही मनांत एकदां विलायतेस जावें असें येऊन त्यांणीं आपली तयारी केली. त्यांणीं विलायतेस जाऊं नये असा त्यांच्या प्रिय मातुःश्रीचा व त्यांचे वृद्ध आजे बाबू गोलोकचंद्र यांचा फार आग्रह होता. परंतु, ह्या मायापाशामध्यें ह्या वेळीं आपण सांपडलों तर ह्या वयाचीं तीं मौल्यवान् वर्षें विनाकारण हातचीं जाऊन मागाहून पश्चा-त्तापाला कारण होईल, असा विचार करून,

मातुःश्रीच्या व वृद्ध पितामह यांच्या आज्ञोल्लंघनाचे पातकाची तादृश पर्वा न बाळगून ते ता० ३ मार्च १८६८ रोजीं विलायतेस जाण्यासाठीं निघाले. इंग्लंडांत गेल्यावर त्यांना सिव्हिल सर्व्हिस परीक्षेचा अभ्यास करावयाचा होता, म्हणून ते लंडनच्या युनिव्हर्सिटी कालेज नामक पाठशाळेंत प्रविष्ट झाले. पहिल्यापासूनच सुरेंद्रनाथ यांचें इंग्लिश भाषानैपुण्य अप्रतिम व वाखाणण्यासारखेंच होतें. आणि लंडन येथें गेल्यावर त्यांनीं इंग्रजी भाषेचे महापंडित म्हणून प्रसिद्ध असलेले प्रोफेसर हेन्री मॉर्ले याचे हाताखालीं त्या भाषेला विशेषच उज्वलित केलें. तसेंच त्यांनीं संस्कृत भाषेचें अध्ययन प्रोफेसर गोल्डस्टकर यांचे हाताखालीं केलें. १८६९ सालीं ३०० वर उमेदवार सिव्हिलसर्व्हिस परीक्षेस बसले व त्या पूर्वपरीक्षेमध्यें, बाबू रमेशचंद्र दत्त, बाबू बिहारीलाल गुप्त, बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी आणि मि० श्रीपाद बाबाजी ठाकूर असे चौघे हिंदु तरुण उतरले; आणि त्या चौघांचेही गुणांच्या क्रमानें ३, १४, २८ आणि ३९ असे नंबर आले.

ह्याप्रमाणें सुरेंद्रनाथ बाबू जरी त्या परीक्षेंत पास झाले तथापि पुढें परीक्षकांनीं ही शंका काढली कीं, सुरेंद्रनाथांचें वय २० वर्षांवर होऊन गेल्यामुळें त्यांना त्या परीक्षेला बसण्याचा अधिकारच रहात नाहीं. त्यांणीं त्यांच्या वयाचेसंबंधानें अशी हरकत काढली कीं, १८६३ सालीं सुरेंद्रनाथ यांची जेव्हां म्याट्रिक्युलेशन परीक्षा उतरली त्या वेळीं जर त्यांचें वय १५ वर्षांचें होतें तर १८६९ सालीं जेव्हां ते सिव्हिल सर्व्हिस परीक्षा देण्यास बसले तेव्हां त्यांचें वय २० वर्षांवर होतें असें सिद्ध होतें. आणि ह्यासाठीं, ते त्या वयांत त्या परीक्षेस बसण्याला योग्य नाहींत. आणि, अशा समजुतीनें, त्या लोकांनीं सुरेंद्रनाथांचें नाव, विशेष चौकशी वगैरे कांहीं एक न करितां, सिव्हिल सर्व्हिस परीक्षेचे उमेदवारांच्या यादींतून काढून टाकलें ! असा अन्याय झाला तेव्हां सुरेंद्रनाथ यांणीं राणी सरकारच्या बेंचीकडे (न्यायाधीशमंडळाकडे) अर्ज करून आपली सर्व हकीकत कळविली. आणि ह्या कामांत आपण पुनः चौकशी केली असतां माझे कामांत होत असलेला अन्याय नाहींसा होईल, अशी त्या अर्जांत विनंति केली. त्या बेंचीमध्यें लंडनचे चीफ जस्टिस परलोकवासी मि. कॉकूबर्न हे मोठे दयाशील व न्यायी जज्ज होते. जज्जांच्या बेंचीनें सुरेंद्रनाथ बाबूंचा अर्ज पाहिल्याबरोबर ज्या सिव्हिलसर्व्हिस कमिशनरांनीं कांहींएक चौकशी न करितां त्याचें नांव काढून टाकिलें होतें त्यास त्यांणीं एकदम नोटिस देऊन कळविलें कीं, तुम्ही सुरेंद्रनाथ बाबूंचे कामांत पुनः नीट पद्धतशीर चौकशी करावी असा आम्ही हुकूम न देण्यास तुमचेजवळ कांहीं कारणें असतील तर तीं दाखवा. त्या कमिशनरांनीं कारणें वगैरे कांहीं न दाखवितां, आम्हाला जें योग्य वाटलें तें आम्हीं केलें, एवढेंच उत्तर दिलें. परंतु त्या उत्तरानें जज्ज मंडळीचें बिलकूल समाधान न होतां त्यांणीं योग्य चौकशी करून त्या कमिशनरांकडे लिहून कळविलें कीं, येथें नुसत्या समजुतीचा भाग उपयोगी नाहीं; गैरसमजुतीनें एका दूर देशच्या तरुणाची निराशा होऊन त्याचा खर्च श्रम विनाकारण व्यर्थ जाणार आहेत. ह्यासाठीं त्यास तुम्हीं पुनः यादीवर चढवून त्यांचा परीक्षेचा हक्क कायम ठेवा. तेव्हां त्या कमिशनरांनींही फारशी कांहीं तक्रार न करितां बाबू सुरेंद्र-

नाथ यांचें नांव पुनः सिव्हिल सर्व्हिसच्या यादीमध्यें दाखल केलें. सुरेंद्रनाथ बाबूंचें नांव ज्या सबबीनें काढून टाकलें होतें त्याच सबबीनें मि. श्रीपाद बाबाजी ठाकूर यांचेंही नांव सदर सिव्हिल सर्व्हिस कमिशनरांनीं काढून टाकलें होतें; परंतु सुरेंद्रनाथांचें नांव पुनः दाखल केलें, तेव्हां त्यांचे बरोबरच श्रीपाद बाबाजी यांचेंही नांव त्यांनीं बिनतक्रार त्या यादीमध्यें पुनः सामील केलें. ह्याप्रमाणें ह्या तरुण हिंदु उमेदवारांवर हें एक आगंतुक संकटच आलें होतें व त्यामुळें त्यांना अनुकूल निकाल मिळेपर्यंत निष्कारण काळजींत व हुरहुरींत दिवस काढावे लागले.

हें जें आगंतुक विघ्न आलें होतें त्याला कारण, हिंदु लोकांच्या वयोमापनपद्धतीविषयींचें इंग्रज लोकांस असलेलें अज्ञान होय. इंग्रज लोकांत वाढदिवसाप्रमाणें वयोमापन करितात, तसें आपलें हिंदूंचें वयोमापन नाहीं. मुलाच्या पहिल्या वाढदिवसानंतर आपण म्हणतों कीं, त्याला दुसरें वर्ष लागलें किंवा तो दोन वर्षांच्या अमलांत आला. युरोपियन लोकांची वयोमापनपद्धति अशी आहे कीं, ते, जो वाढदिवस होईल त्या वाढदिवसाच्या पूर्वींचेंच वर्ष त्याचा पुढील वाढदिवस येईपर्यंत समजतात. मुलाचा पहिला वाढदिवस संपून दुसरा वाढदिवस येईपर्यंत त्याला एक वर्षाचाच मुलगा समजतात. दुसरा वाढदिवस झाल्यानंतर तिसरा वाढदिवस येईपर्यंत त्याचें वय दोन वर्षांचेंच समजलें जातें. परंतु आमची पद्धति ह्या मोजणीपेक्षां वेगळी असल्यामुळें, आमच्या मोजणीनें पाहिलें असतां एकेका वर्षानें आमचीं वयें अधिक धरलीं जातात. ह्या तफावतीवरून वाचकांच्या हें सहज लक्ष्यांत येईल कीं, बाबू सुरेंद्रनाथ हे म्याट्रिक्युलेशन परीक्षेस बसले तेव्हां त्यांचें वय जें १५ वर्षांचें धरण्यांत आलें तें त्या वेळीं १४ वर्षांचेंच असून ते बी. ए. परीक्षा उतरले तेव्हां त्यांचें वय १९ वर्षांचें होतें व सिव्हिलसर्व्हिस परीक्षेला बसले तेव्हां त्यांचे वयास २० वें वर्ष चालू असून शेवटची परीक्षा ते २१ वर्षें भरण्याचेपूर्वींच देणार होते. ही वयोमापनपद्धति इकडच्या लोकांस माहीत नसल्यामुळें निनाकारण एक वर्षाच्या ज्यास्त मुदतीला धोका बसण्याचा संभव असतो. परंतु तो सर्व गैरसमज पूर्ण चौकशीअंतीं इंग्लंडच्या जज्जांनीं दूर करून, पुनः सुरेंद्रनाथ बाबूंना प्रोत्साहित केलें. ह्या वयोमापनपद्धतींतला भेदाभेद समजून घेण्यास बरेच श्रम व वेळ लागल्यावांचून त्या प्रश्नाचा निकाल लागला नाहीं. बाबू सुरेंद्रनाथांच्या वयावेसंबंधानें इंग्लंडच्या जज्जांपुढें कलकत्याचे त्या वेळेचे सुप्रसिद्ध गृहस्थ महाराजा रमानाथ ठाकूर, बाबू कृष्णदास पाल, पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर आणि महाराजा सर यतींद्रमोहन ठाकूर यांच्यांसारख्या थोर थोर गृहस्थांचे दाखले नेऊन हजर करण्यांत आले, तेव्हां बाबू सुरेंद्रनाथ यांचे वयाबद्दल वरील जज्जमंडळीची पुरी खात्री होऊन, त्यांणीं, वर सांगितल्याप्रमाणें, सिव्हिलसर्व्हिस कमिशनरांना त्यांचें नांव पुनः यादीमध्यें दाखल करण्यास सक्तीनें सांगितलें.

बाबू सुरेंद्रनाथ यांनीं आपलें नांव पुनः सिव्हिल सर्व्हिस परीक्षेचे उमेदवारांत दाखल होण्यास एक वर्षभर फारच झटून मेहनत घेतली; आणि १८७०च्या फेब्रुवारी महिन्यांत त्यांचें नांव निवडक उमेदवारांत दाखल होऊन, १८७१ त त्यांना ती परीक्षा देण्याचा हुकूम मिळाला. त्यांचें एक वर्ष, आपलें नांव निघालें होतें तें फिरून दाखल होण्यासाठीं बिनाकारण गेलें;

आणि त्याप्रमाणें नांव दाखल झाल्यानंतर त्यांना १८७१ मध्येंच सिव्हिल सर्व्हिसची शेवटील परीक्षा देण्यास तयार असा असें कळविण्यांत आलें. म्हणजे, दोन वर्षांचा अभ्यास त्यांना एका वर्षांत करणें भाग होतें असें झालें. तथापि त्यांनीं आपलें धैर्य सोडलें नाहीं तर, अशा प्रसंगीं मोठ्या नेटानें अभ्यास करून आलेला सुप्रसंग दवडावयाचा नाहीं, असा त्यांनीं निश्चय करून, त्या अवशिष्ट एक वर्षांत त्यांणीं परीक्षेची पूर्ण तयारी केली व त्या परीक्षेंत ते मोठ्या शर्तीनें पास झाले. बाबू सुरेंद्रनाथ यांचे वयाबद्दल तकरार पडून मोठ्या श्रमानें ते पुनः परीक्षेला उमेदवार उभे राहण्याची खटपट चालली असतांच त्यांचे प्रिय व पूज्य पिते डा. दुर्गाचरण बानर्जी हे फार आजारी होते. त्यांना आपल्या पुत्राचे यशाबद्दल मोठी काळजी होती; आणि त्या काळजींतच त्यांचा अंत झाला! कलकत्त्यास डा. दुर्गाचरण वारले त्याच दिवशीं लंडन येथें बाबू सुरेंद्रनाथ यांस पुनः सि. स. च्या उमेदवारांचे यादींत दाखल करण्यांत आलें, व ती आनंदकारक बातमी डा. दुर्गाचरण यांस कळण्यासाठीं विलायतेहून बाबू सुरेंद्रनाथ यांणीं तारेनें रवानाही केली होती; परंतु ती त्यांचे कानावर ते जिवंत असतां आली नाहीं. डा. दुर्गाचरण बानर्जी हे वारल्यानंतर दुसरे दिवशीं, म्हणजे ता. २१ फेब्रुवारी सन १८७० सोमवार रोजीं, वरील आनंदाची बातमी कलकत्त्यास येऊन पोंचली. त्या वेळीं बानर्जी यांचें सर्व कुटुंब डा० दुर्गाचरण यांच्या मृत्युदुःखानें सशोक व खिन्न असें होऊन बसलें होतें! असो. बाबू सुरेंद्रनाथ हे १८७१ च्या सप्टेंबर महिन्यांत सिव्हिलसर्व्हिस परीक्षेंत पास झाले.

## सनदी बाबू सुरेंद्रनाथ आणि त्यांचे वरील संकटें!

बाबू सुरेंद्रनाथ हे सिव्हिलियन होऊन ह्या देशांत परत आले आणि त्यांस सिल्हट येथें असिस्टंट कलेक्टर व माजिस्ट्रेट नेमण्यांत आलें. सिल्हट जिल्हा आसाम प्रांतांत असून, त्या वेळीं तो प्रांत तेथील चीफ कमिशनरच्या ताब्यांत असे. हल्लीं तो प्रांत बंगालच्या लेफ्टेनंट गव्हरनरच्या ताब्यांत आहे. १८७१ सालीं बंगालचे लेफ्टेनंट गव्हरनराचे जागीं सर जॉर्ज क्यांबेल हे असून, लार्ड नॉर्थ ब्रूक हे त्या वेळीं हिंदुस्थानचे व्हाइसराय आणि गव्हरनर जनरल होते.

बाबू सुरेंद्रनाथ हे आपल्या अधिकारावर सरासरीनें दोन वर्षेंच असतील; तों सरकारच्या दुर्दैवानें व लोकांच्या सुदैवानें बाबू साहेबांवर कांहीं आरोप येऊन त्यांची चौकशी चालली. ह्या आरोपाचा सारांश असा आहे कीं, बाबू सुरेंद्रनाथ यांनीं एक खटला फेरारी रजिस्टरकडे बदलण्याचा हुकूम करून तत्संबंधानें अयोग्य रीतीनें (येथें सरकारी कागदपत्रांत "अप्रामाणिकपणानें" ह्या शब्दाचा उपयोग केला आहे; परंतु असला शब्द लावण्याचें कारण काय हें सदर खटल्याचे संबंधानें एकंदर सरकारी रीतीचें स्वरूप बघितलें तरी, समजत नाहीं) वारंट काढलें; आणि त्याबद्दल त्यांचेकडे जबाब विचारतां त्यांजकडून खोटा जबाब सादर करण्यांत आला. सुरेंद्रनाथांवर आणलेल्या आरोपाचा जरी हा सारांश आहे तरी ह्या आरोपांत निरनिराळे १४ पोट-आरोप गोंविले होते; व ह्या आरोपांची चौकशी कमिशन बसून त्यापुढें चालावयाची असें ठरलें होतें. ह्या कमिशनापुढें बाबू सुरेंद्रनाथ यांचेवर खट-

ला चालविण्यास दुर्दैवानें मि. ओको ली हे सरकारी वकील असून, कमिशन धील मुख्य जज्ज ( त्या वेळीं हुगळीस सलेले जज्ज ) मि. प्रिन्सेप हे होते. ह दोन्ही मूर्ति, प्रसिद्ध वहाबी अमीरुद्द याचेवर जो खटला चालला होता त्य प्रसिद्धीस आल्या होत्या; म्हणजे, त्यांनीं स रकारास पाहिजे तसेंच काम करून वरी वहाबी अमीरुद्दीन याजवर दोषारोप करू त्याबद्दलचें त्यास शासन केलें होतें. तेव्हां स कारास त्याच मूर्ति सुरेंद्रनाथ बाबूंवर चालवा याच्या खटल्यांतही नेमण्याची बुद्धि होऊ त्यांची मुद्दाम योजना करण्यांत आली. ह्या संबंधानें त्या वेळीं बंगालच्या पत्रांतून फा गवगवा झाला. प्रसिद्ध परलोकवासी बा कृष्णदास पाल, यांनीं आपल्या हिंदु पेट्रि यट नामक पत्रांत त्या वेळीं वरील मूर्तींच्या योजनेवरून असें म्हटलें होतें कीं, " बा सुरेंद्रनाथ बानर्जी हे वहाबी आहेत काय ? " असो. बंगाल्यांतल्या पत्रांनीं ह्या मूर्तींविषयं जरी इतका गवगवा केला व अमान्यत दर्शविली तरी सरकारानें तिकडे लक्ष न देतां मि. प्रिन्सेप प्रेसिडेंट, आणि मैमेन सिंगचे माजि. मि. रिनालड्स व आसामचे डे० कमिशनर मेजर हॉलरॉइड् हे दोघे मेंबर अशा तीन अधिकाऱ्यांचें कमिशन नेमून, वर लिहिल्याप्रमाणें, मि. ओकेनिली ह्यांस वकील नेमिलें आणि ह्या कमिशनचे काम १८७३ च्या नोवेंबरमध्यें सिल्हट येथें सुरू झालें.

बाबू सुरेंद्रनाथ यांणीं, हें कमिशन कलक त्यास बसून तेथें आपली चौकशी चालावी म्हणजे आपल्याला पाहिजे तशी वकील ब्यारिस्टरांची मदत मिळण्यास सोय होईल व आपल्या खटल्याचें स्वरूप काय आहे तें लोकांनाही कळेल, असा सरकारास अर्ज केला. परंतु बाबूसाहेबांचें म्हणणें सरकारानें नाकबूल केलें. तरी त्यांस पाहिजे ते वकील ब्यारिस्टरांची मदत देण्याचें कबूल केलें. तेव्हां बाबूसाहेबांनीं सरकारास कित्येक गृहस्थांचीं नांवें कळवून ते ब्यारिस्टर आपल्या मदतीस बोलवावे म्हणून सुचविलें असतां, सरकारानें तें कबूल केलें नाहीं. सारांश, सरकारानें कबूल करावयाचें एक व पुढें वागावयाचें भलत्याच रीतीनें, हा विलक्षण प्रकार ह्या खटल्यांत उघड उघड दिसून आला. ह्या कमिशनाचें काम कित्येक दिवसपर्यंत चालून, कमिशनरांनीं आपला रिपोर्ट सरकाराकडे पाठविला; व त्यांत बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी यांचेवर जे आरोप केले होते ते सर्व शाबीत असल्याबद्दलचा आपला अभिप्राय कळविला होता. तो रिपोर्ट बंगाल सरकार व हिंदुस्थान सरकार यांचेकडे विचारास जाऊन, त्या दोन्ही सरकारांनीं तो मान्य केला; आणि बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी यांस सरकारानें १८७४ च्या मार्चपासून नोकरीतून काढून टाकून त्यांस ५० रुपये महिन्याप्रमाणें पेन्शन देण्याचा ठराव केला. ह्याप्रमाणें सुरेंद्रनाथ बाबूंवर आलेल्या आरोपांचे चौकशीचा हा निकाल झालेला ऐकून सर्व बंगाल देशांत मोठा गवगवा झाला.

ह्या गोष्टीस २१ वर्षांवर दिवस झाले, तेव्हां आतां झाल्या गोष्टीबद्दल पुनः वादविवाद वाढावा अशी आमची इच्छा नाहीं. व त्या अत्यंत असमाधानकारक निकालाचें सर्व लोकांस आतां अगदीं विस्मरणही झालें आहे. तेव्हां हा जुना प्रश्न काढून त्यावर टीका करण्यांत कांहीं अर्थ नाहीं. तथापि ही हकीकत आमचे वाचकांस कळवितांना आम्हाला येवढें म्हटल्यावांचून राहवत नाहीं कीं, बाबू सुरेंद्रनाथ यांच्या आजपर्यंतच्या एकंदर वर्तणुकीवरून त्यांजवर अशा प्र

कारचे आरोप येऊन ते शाबीत झाले असें म्हणणें, यांत कांहीं तरी जातिमत्सराचा किंवा काळ्या गोऱ्या कातडीचे तफावतीचा अभिमान कारण झाला असावा. एरवीं सुरेंद्रनाथ यांच्यावर त्या आरोपाची कोणत्याही रीतीनें शाबिती होण्यासारखें त्याचें स्वरूपच दिसत नाहीं. परंतु कोणत्याही रीतीनें हातांत सांपडलेल्या नेटिव सिव्हिलियनाला निर्दोष सोडून देणें हें चौकशीस बसलेल्या युरोपियन न्यायत्रिमूर्तीस बरें वाटलें नसावें; व त्याप्रमाणें त्यांणीं बाबूसाहेबांस सदोष ठरविलें असलें पाहिजे. मनुष्य जर खरोखर असच्छील व दुराचारी असेल तर त्याच्या त्या शीलाचारांत एकाएकीं, एखाद्या अद्भुत कृत्याप्रमाणें, विलक्षण फेरफार झालेला असा कदापि व कोठेंही आढळणार नाहीं. जो मनुष्य सरकारच्या दृष्टीनें अप्रामाणिक, अयोग्य व अविश्वासू असा ठरतो त्याचें एकंदर सार्वजनिक वर्तन, त्याच्या अवघ्या आयुःक्रमांत एकसारखें सरळ, निर्दोष, परमोत्साही, एकनिष्ठपणाचें आणि अत्यंत विश्वसनीय व अनुकरणीय असें आढळून येतें, हें आश्चर्य नव्हे काय! मनुष्य आज अप्रामाणिक, अविश्वस्त व अनीतिमान् होऊन, उद्यांपासून त्याच्या सर्व आयुश्चरित्रांत तो पूर्णपणें प्रामाणिक, विश्वासू, नीतिमान्, गंभीर, सदाचारसंपन्न, देशहितेच्छु, आत्महितपराङ्मुख, परहितद्रष्टा, नैष्ठिक आणि अन्यायद्वेष्टा असा बनावा, व अशी फेरबदल एकाएकीं होणें असंभाव्य व अशक्य असल्यामुळें, बाबू सुरेंद्रनाथ यांजवर आणलेल्या आरोपांकडे व त्यांच्या एकंदर वर्तनाचे दिशेकडे बघितलें असतां, तीं परस्पर अत्यंत भिन्न असल्यामुळें, त्यांना दोषी ठरविणारांची नजरच सदोष असली पाहिजे असाच निष्कर्ष, ह्या खटल्याचा सांद्यंत विचार केला म्हणजे निघतो. सुरेंद्रनाथ बाबूंच्या एकंदर आयुश्चरित्राकडे बघितलें म्हणजे त्यांच्या इतके सत्यनिष्ठ व खऱ्या कळकळीचे पुरुष आपल्याला फारच थोडे सांपडतील. आणि अशा पुरुषांकडून, त्यांजवर आलेले दोषारोप खरेच घडलेले असावे असें न्याय करण्यास बसलेल्या न्यायत्रिमूर्तीस वाटावें, अशा प्रकारचें सुरेंद्रनाथ बाबूंचें आचरण क्वचित व केव्हांही नव्हतें, हेंच सत्य दिसतें. परंतु, वर लिहिल्याप्रमाणें, कांहीं दुरभिमान—पिशाचिकेची बाधा झालेल्या गौरकाय अधिकाऱ्यांकडून असा विपरीत न्याय झाल्यास त्यांत आश्चर्य कसलें!

बाबू सुरेंद्रनाथ यांचेवर आलेल्या आरोपांची चौकशी करण्याचे कमिशनांतील मुख्य जज्ज मि० प्रिन्सेप व त्यांचे मित्र बसले होते, तेव्हा त्यांनीं त्या आरोपांची बाबू साहेबांवर शाबिती झाली म्हणून आपला जो अभिप्राय दिला तो बरोबर होता काय! तसें तर काय; परंतु त्यांचेपुढें चाललेल्या खटल्याची खरी हकीकतसुद्धां कमिशनाला नीट समजून आली नाहीं. बाबूसाहेबांच्या ज्या हुकुमावरून हे खटलें उपस्थित झाले तो हुकूम त्यांनीं कसा दिला ह्याचें सयुक्तिक कारण कमिशनानें लक्ष्यांत आणिलेंच नाहीं. बाबू साहेबांच्यापुढें एक खटला बरेच दिवस पडून राहिला होता. तो लवकर सुनावणीस निघाला नाहीं; व असा विलंब लागण्याचें कारण काय? असा वरिष्ठांकडून पुढें आपल्याला प्रश्न येऊन त्याचा जाब देणें भाग पडेल; तेव्हां तो जाबजबाबाचा प्रसंग टाळावा म्हणून त्यांणीं तो खटला "फेरारी रजिस्टरा" चे यादींत दाखल करून आपल्या पुढून दुसरीकडे बदलला; असें स्वरूप, सरकारतर्फेनें त्यांचेवर जें काम सुरू झालें त्याला दिलें होतें.

नं. ११
ना. ........

पण वस्तुस्थिति अगदीं वेगळी होती. "असा खटला आपल्या कोर्टांत कुचंबून राहिला असून त्याची अशी कांहीं व्यवस्था व्हावी म्हणून असा हुकूम आपण जाणूनबुजून दिला नाहीं; तर त्याबद्दलचा आपल्या सहीनें जो हुकूम सुटला तो हुकूम मी मुळींच वाचून न पाहतां, आफिसांतील इतर जे बहुत कागद सह्यांना मजपुढें येऊन मी ज्यांचेवर सह्या केल्या त्या कागदांत वरील हुकुमाचा कागद येऊन गफलतीनें त्याचेवर माझी सही झाली; पण तसा हुकूम आपल्याकडून सुटल्याचें आपल्याला मुळींच माहीत नाहीं," असें बाबूसाहेबांनीं कमिशनास कळविलें आणि तीच गोष्ट खरी होती. कारण, पुढें त्याच खटल्याचेसंबंधानें बाबूसाहेबांचेकडे पुनः अर्ज दाखल झाल्यावर त्यांणीं त्याबद्दलचे सर्व कागदपत्र आपल्या कोर्टांत असतील ते हजर करण्याविषयीं हुकूम केला. परंतु पुढें त्यांस हाताखालच्या मनुष्यांनीं कळविलें कीं, तो खटला आपल्या हुकुमावरून फेरारी रजिस्टराचे यादींत दाखल होऊन तिकडे सर्व कागदपत्र पाठविण्यांत आले. तेव्हां ही चूक कशी झाली? ह्याबद्दल त्यांना मोठें गूढ पडलें; व पुढें त्याबद्दल त्यांणीं खुलासेवार सर्व हकीकत वरिष्ठाकडे कळविली. हा खटला कुचंबून बरेच दिवस आपल्या कोर्टांत राहिला व त्याजबद्दल आपल्याला जाबजबाब द्यावे लागतील म्हणून बाबूसाहेबांनीं तो खटला मुद्दाम आपल्याकडून फेरारी रजिस्टराकडे पाठवून दिल्याबद्दलचें फिर्यादीतर्फे म्हणणें होतें तें म्हणणें निरर्थक निराधार होतें, हें उघड दिसतें. कारण, त्यासंबंधानें आपल्याला जाबजबाब करणें पडावें व त्याबद्दलचा आपल्याकडील दोष टाळावा अशी जर बाबू सुरेंद्रनाथ यांची इच्छा व हेतु असता तर त्यांणीं मागाहून त्या खटल्यांबद्दलची जी इतकी पूसतपास व जाबजबाब केले त्यांचें कांहीं-एक प्रयोजन नव्हतें. तसेंच, फेरारी रजिस्टरमध्यें कोणतेही खटल्याचे संबंधानें कागदपत्र गेले म्हणजे, रीतीप्रमाणें, कोणत्याही प्रकारची चौकशी व पूसतपास करण्याची मुळींच जरूर नव्हती; असें असून बाबूसाहेबांनीं आपल्या सहीचे हुकुमाची जी गफलत झाली ती लक्ष्यांत आणून पुढें त्याबद्दल खुलासेवार तपशील आपल्या रिपोर्टांत केला. त्यांणीं जर तो हुकूम जाणूनबुजून दिला असता तर त्यांणीं ह्या प्रकारचा खुलासा व तपशील मागाहून मुळींच केला नसता. ही सर्व हकीकत त्या वेळीं वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झाली असून, त्या वेळचे बहुत कायदे पंडितांनीं बाबूसाहेबांवर चाललेल्या खटल्याचे चौकशीचे संबंधानें आपलें असें मत प्रसिद्ध केलें कीं, बाबूसाहेब हे त्यांजवर आलेल्या आरोपांतून अगदीं मुक्त आहेत. राजा दिगंबर मित्र यांनीं ह्या कमिशनपुढें चाललेल्या एकंदर चौकशीचे जे कागदपत्र प्रसिद्ध केले आहेत त्यांत शेवटीं त्यांनीं असेंच म्हटलें आहे. हें कांहीं असो. सर्व न्यायवेत्त्या लोकांचा अभिप्राय जरी बाबूसाहेबांच्या निर्दोषतेसंबंधानें पडला तरी, कमिशनांतल्या तिन्ही जज्जांना बाबूसाहेबांवर दोष लागू झाला असें जें वाटलें त्याला, पुढें त्यांस जी शिक्षा देण्यांत आली ती फारच निष्ठुरतेची व अत्यंत निर्दयतेची होती. गफलतीनें एका हुकुमावर सही होऊन तो हुकूम अमलांत आला, व तें कामही फार मोठ्या जबाबदारीचें अथवा पक्षकारांच्या जीववित्तावर येऊन बेतण्यासारख्या आणीबाणीच्या स्वरूपाचें नसून, अगदीं साधारण होतें. असें असून, त्या यःकश्चित् चुकीबद्दल त्यांस सरकारानें आपल्या नोकरींतून जन्माचें

दूर केलें, हें कांहीं चांगलें केलें नाहीं. असें करण्यांत सरकारानें आपला फाजील कडवेपणा दाखवून, भलत्याच मनुष्यावर तो कडवेपणा गाजविला! तो गाजविण्यास सुरेंद्रनाथ हे तरुण गृहस्थ खरोखर योग्य नव्हते, असें त्या गोष्टीस आज इतके दिवस होऊन गेले आहेत तथापि, शांत विचाराच्या प्रत्येक सिव्हिलियनास वाटल्यावांचून राहणार नाहीं सुरेंद्रनाथ बाबूंच्याकडून आजपर्यंत जी स्वदेशसेवा झाली आहे तिकडे बवितलें म्हणजे असें वाटतें कीं, त्यांचेवर असा खोटानाट आरोप येऊन, त्यावरून ते सरकारी नोकरींतून दूर झाले, हें एक प्रकारें ह्या देशा मोठें सुदैवच होय. ते सरकारी नोकरींतून दूर झाल्यामुळें, मोठ्या कळकळीनें त्यांचेकडून जें स्वदेशबांधवांचें हित होत आलें आहे तें हित व ती कळकळ, ते सरकारी नोकरींत असते तर त्यांचेकडून दाखविण्यांत आली नसती. ते आपल्या नोकरींत असते तर आज ते एक सुप्रसिद्ध जज्ज किंवा माजिस्ट्रेट म्हणून नांवाजले गेले असते. ह्यापेक्षां त्यांची ज्यास्त कांहीं प्रसिद्धि झाली असती असें वाटत नाहीं. आणि ते त्या परवशतेंतून दूर झाल्यामुळें आज ते उत्कृष्ट वर्तमानपत्रकार अद्वितीय वक्ते, मोठे मुत्सद्दी व कारस्थानी आणि लोकोत्तर देशाभिमानी म्हणून जी त्यांची सर्वत्र सुप्रसिद्धि झाली आहे ती झाली नसती, हें खास आहे. त्यांचें नांव व त्यांचा लौकिक देशहितचिंतक, देशाभिमानी व देशैकनिष्ठ म्हणून जो सर्वत्र पसरला आहे तो ते सरकारी नोकरींत असते तर कधींही झाला नसता हें उघड आहे. एक गोष्ट असमाधानकारक होण्यांत दुसऱ्या अनेक गोष्टी विशेष समाधानकारक होतात म्हणून जें म्हणतात त्याचा अनुभव ह्याप्रमाणें कधीं कधीं विलक्षण रीतीनें येतो, हें बा सुरेंद्रनाथ यांच्या चरित्रलेखाकडे अवलोकन केलें म्हणजे समजून येतें।

## त्यांचें दुसऱ्यांदा इंग्लंडास गमन व ब्यारिस्टरच्या परीक्षेची निराशा.

बाबू सुरेंद्रनाथ यांजवरील खटल्याचा निकाल होऊन त्यांना बर्तर्फीचा हुकूम मिळण्यापूर्वींच ते आपला सर्व खटला इंग्लंडांतल्या अधिकाऱ्यांपुढें ठेवून तो त्यांना समजून सांगण्याकरितां १८७४ च्या मार्च महिन्यांत इंग्लंडास निघून गेले होते. ते पुढच्या एप्रिलमध्यें विलायतेस पोंचले; आणि त्यांना नोकरींतून बर्तर्फ केल्याचा ठराव ता० ३१ मार्च १८७४ रोजीं झाला. म्हणजे, ह्या ठराव होण्यापूर्वीं ते विलायतेस पोंचून त्यांना आपला खटला योग्य अधिकाऱ्यांपुढें मांडून सुनावण्याची संधि मिळाली पाहिजे होती. परंतु तसें झालें नाहीं. व ते ज्या हेतूनें मुद्दाम विलायतेस गेले तो हेतु जागच्याजागींच राहिला. तथापि, ते ज्याअर्थीं ह्या वेळीं विलायतेस गेले होते त्याअर्थीं त्यांणीं, सरकारी नोकरी गेली तरी ब्यारिस्टरची परीक्षा देऊन पुढें स्वतंत्रपणें तो धंदा आपले शांत चालविण्याचें ठरवून, मिडल् टेंपल् ध्यें ब्यारिस्टरच्या परीक्षेच्या सर्व टर्म्स भरू तयारी केली; परंतु, हिंदुस्थान सरकारच्या विरुद्ध हुकुमावरून त्या परीक्षेला त्यांस ण्याचें परीक्षकांनीं नाकारलें. तेव्हां, बाबूसाहेबांनीं त्या परीक्षकांपुढें आपल्या खटल्याचे एकंद कागदपत्र ठेवून, त्यांचा शांततेनें विचा करून त्यांणीं आपल्याला परीक्षेला बसण्याची परवानगी द्यावी, म्हणून फार खटप केली. पण त्या खटपटींतही त्यांना य मिळालें नाहीं ! बाबू सुरेंद्रनाथ यांस न्या न मिळून चोहोंकडे त्यांना जें अपेश आहे हें चांगलें नाहीं असें वाटून, त्यांचेवि प्रेम बाळगणारे मि. जॉन कॉक्रन नांवाचे

कत्याचे एक जुने व वृद्ध ब्यारिस्टर विलायतेंतच होते त्यांणीं त्यांस या वेळीं फार साहाय्य केलें. परंतु लंडन येथें कोणाच्याच यत्नास यश मिळालें नाहीं! आणि शेवटीं, बाबूसाहेब १८७५ च्या जूनमध्यें इंग्लंडाहून निघून हिंदुस्थानांत येऊन दाखल झाले. त्या वेळीं त्यांची कशी काय स्थिति होती ती येथें शब्दांनीं सांगण्यापेक्षां वाचकांस कल्पनेनें सहज कळण्यासारखी आहे. सर्व प्रकारच्या आशा, उमेद, उत्साह आणि कर्तबगारी यांणीं सर्वांशीं आपल्यापासून दूर हांकून दिलेल्या हतभाग्य पुरुषाप्रमाणें बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी हे अत्यंत हताश, नाउमेद, निरुत्साह आणि सर्व प्रकारें सर्व ऐहिक समाधानानंदास मुकलेले असे, आपलें ऐन तारुण्य व कर्तृत्वाचा जोम व्यर्थ गेल्यासारखें होऊन, पुढील कष्टमय आयुष्य कंठण्यास व जें जें भवितव्य असेल तें निरुपायानें भोगण्यास स्वदेशीं येऊन दाखल झाले! त्या वेळची त्यांची ती केविलवाणी आणि कींव उत्पन्न होण्यासारखी स्थिति अत्यंत हृदयद्रावक व अनुकंपनीय होती! तथापि, त्यांच्या पुढील वर्तनावरून, त्यांनीं आलेला तो प्रतिकूल काळ तसाच मोठ्या धैर्यानें व नेटानें कंठून, आपल्या अंगचे बहुमोल गुण स्वदेशसेवातत्पर होऊन दाखविले, आणि त्यावरून त्यांचें अतुल धैर्य, परमावधीची सहनशीलता आणि अभंग उमेद व आशा हीं जणूं काय त्यांनीं आपल्या स्वरूपानेंच जगापुढें मूर्तिमंत उभीं केलीं, असें म्हटलें पाहिजे. असल्या धैर्यशीलाचे पुरुष आपल्याला जगामध्यें फारच क्वचित् आढळतात.

**सार्वजनिक कामें—उत्कृष्ट अध्यापक.**

बाबू सुरेंद्रनाथ यांना सरकारी नोकरींतून बर्तर्फी मिळाली व तेणेंकरून त्यांचें मोठें नुकसान होऊन त्यांच्या मनाला उदासीनता येण्याला कारण झालें हें खरें; परंतु ह्या सर्व गोष्टी घडून येण्यांत पुढें या हतभाग्य देशाचें त्यांच्या हातें फार मोठें कल्याण व्हावयाचें होतें. आणि त्याकरितांच येथपर्यंत बाबूसाहेबांस अनेक प्रसंगीं अपेशाचे धक्के बसले. अनेक प्रकारचे कष्ट व श्रम सोसून अखेरीस त्यांच्या वांटयास अपेशच आलें; व ह्यामुळें ते अत्यंत निराश व निरुत्साह झाले; तथापि, त्यांचें धैर्य फार मोठें असून, त्यांणीं आतां आपल्या आयुष्यांत आपल्याला पुढें कांहींएक कर्तव्य राहिलें नाहीं, असें कांहीं मनांत वागविलें नाहीं. त्यांना निराश व नाउमेद होण्याला जीं कारणें बाह्यतः झालीं तींच कारणें अंतःस्थ रीतीनें त्यांना स्वदेशहिताला जागरूक राहून, देशबांधवांचें कांहीं तरी कल्याण आपल्या हातें होईल तर पहावें, अशी दृढतर प्रेरणा होण्यासही साहाय्य झालीं, असें म्हटलें तरी चालेल. त्यांचें निश्चयबल आणि कोणत्याही कार्याला हात घातल्यावर तें सिद्धीस नेण्याचा आवेश हे गुण त्यांजमध्यें असाधारण असून, त्याच श्रेष्ठ गुणांनीं त्यांना त्यांच्या कोणत्याही स्थितींत औदासीन्य व निरुत्साह हीं तादृश कधींच आलीं नाहींत. त्यांचा सरकारी नोकरीचा पाश तुटल्यावर कलकत्याचे प्रख्यात व बहुसंमान्य पंडितवर्य ईश्वरचंद्र विद्यासागर यांणीं त्यांस आपल्या मेट्रापोलिटन कालेजांत इंग्लिश भाषेचे मुख्याध्यापक (प्रोफेसर) ह्या हुद्यावर १८७६ च्या जानेवारी महिन्यापासून २०० रुपये दरमहावर नेमलें. पंडित विद्यासागर आणि बाबू सुरेंद्रनाथ यांचे वडील कै० बाबू दुर्गाचरण बानर्जी यांचा फार स्नेह असून, सुरेंद्रनाथ बाबू हे अन्यायानें नोकरींतून दूर झाले ह्यामुळें, कलकत्याच्या लोकांत ज्यांस अतिशय वाईट वाटलें त्यांत पंडितवर्य ईश्वर-

चंद्र विद्यासागर हे एक असून, त्याबद्दल त्यांचें अंतःकरण फारच कष्टी झालें. तथापि, सरकारी नोकरी म्हणजे अळवावरचें पाणी किंवा सुळावरची पोळी असून तींत सर्वांशीं दुसऱ्यास विकून घेऊन केवळ परावलंबी होऊन रहावें लागतें; व तशी स्थिति स्वातंत्र्यप्रिय मनुष्यास अत्यंत प्रतिकूल व कष्टावह आहे हें स्वतः त्यांसही अनुभूत असल्यामुळें, त्यांणीं, बाबू सुरेंद्रनाथ हे परवशतेंतून मोकळे झाले यांत लाभच मानून, त्यांस आपले विद्यालयांत, वर लिहिल्याप्रमाणें, इंग्लिश भाषा व साहित्य याचे प्रोफेसर नेमलें.

बाबू सुरेंद्रनाथ यांनीं पंडितवर्य ईश्वरचंद्र विद्यासागर यांचे मेट्रोपोलिटन कालेजांत इंग्लिश भाषाविषयाचे प्रोफेसराची जागा पतकरल्यावर त्यांजकडून लोकशिक्षणाचें काम उत्तम रीतीनें सुरू झालें. त्यांना आपलें कालेजांतील काम उरकून पुष्कळ वेळ सांपडूं लागला. पंडित विद्यासागर यांनीं आपल्या ह्या पडत्या काळांत आपल्या योग्यतेचा विचार करून व तिचा उपयोग करून घेण्याचें स्वीकारल्यावरून बाबूसाहेबांस त्यांचे मोठे उपकार वाटले. परंतु पंडित विद्यासागर यांस उलट असें वाटलें कीं, अशा तरुण पुरुषाचे मदतीचा वांटा आपल्या कालेजाकडे आला हें आपल्या कालेजाचें महद्भाग्य होय, व असा विद्वान् पुरुष आपल्याला अल्प वेतनांत मिळाला ही सुरेंद्रनाथ बाबूंची आपल्यासंबंधाची निष्ठा व प्रेमबुद्धि होय. बाबू सुरेंद्रनाथ यांस असें वाटत होतें कीं, आपल्या अशा असह्य व निरुपायस्थितींत आणि आपल्या अपेशी काळांत आपल्याला विचारणार कोण? अशा चिंतेंत व निराशेंत ते अल्पकाळ निश्चल असतां पंडितवर्य विद्यासागर यांनीं त्यांनकडे जाऊन त्यांना चेतना आणिली. त्यांची उदासीनता घालवून, झाल्या त्या सर्व गोष्टी फायद्याच्याच झाल्या; तुम्हाला सर्व प्रकारें स्वतंत्रता मिळून आपल्या देशाचे व देशबंधूंचे उपयोगी पडण्याला पूर्णपणें मोकळीक मिळाली; इत्यादि प्रकारें अनेक उत्तेजनाच्या गोष्टी सांगून त्यांच्या त्या हताशवृत्तीस त्यांणीं टवटवीतपणा आणिला; आणि त्यांचा आशांकुर जो अगदीं मलूल होऊन करपून जाण्याच्या बेतांत होता त्याला प्रोत्साहनाचें जल घालून तो ताजातवाना केला. बाबू सुरेंद्रनाथ हे त्यांच्या विद्येनें व हुशारीनें तर पंडित विद्यासागर यांस मान्य होतेच; परंतु ते आपले प्रिय मित्र कै० डा० दुर्गाचरण यांचे पुत्र होत व त्यांचेवर असा निराश व निरुत्साह होऊन बसण्याचा प्रसंग आला हें बघून, पंडित विद्यासागर यांचें अंतःकरण फारच कळवळलें; व अशा तरुण आणि होतकरू विद्वानास वायां जाऊं देतां उपयोगी नाहीं असें मनांत आणून, त्यांणीं, वर लिहिल्याप्रमाणें, त्यांची स्वतः भेट घेऊन व त्यांच्या दुःखी व सखेद झालेल्या मनाला उत्तम प्रकारें आश्वासन देऊन, त्यांचेमध्यें तरतरी व नवा दम आणिला. आणि त्यांस, आपल्याला ह्यापुढें देशकार्याचे उपयोगी कसें पडतां येईल त्याचा थोडक्यांत खुलासा केला. पंडितजींच्या प्रोत्साहनानें बाबू साहेबांस, आपण जगांतून अगदीं उठल्यासारखे झालों असें जें वाटत होतें तें वाटणें निराधार असून, पंडितजी सांगतात ह्याप्रमाणें कांहीं तरी केल्यानें आपलें आयुष्य अगदींच व्यर्थ गेलें असें होणार नाहीं, असें वाटूं लागलें; व त्यांनीं दिलेली २०० रुपये दरमहाची अध्यापकाची नोकरी पतकरून ते त्यांचे कॉलेजांत इंग्लिश प्रोफेसराचें काम करूं लागले.

हें काम करीत असतां त्यांना पुष्कळ वेळ सांपडत होता हें वर कळविलें आहेच

त्याच वेळीं सिटी कालेज नांवाची एक नवी पाठशाळा कलकत्त्यास स्थापन होऊन त्या पाठशाळेंत त्यांस एक दोन तासांचें काम मिळालें. व तें त्यांनीं पंडित विद्यासागर यांच्या पूर्ण अनुमोदनानें पतकरलें. ह्याप्रमाणें त्यांचा अवशिष्ट काळ बराच उपयोगांत जाऊं लागून त्यांच्या मनाची उदासीनता हळू हळू नाहींशी होत चालली. मेट्रोपोलिटन कालेजांत त्यांनीं पांच वर्षें काम करून पुढें १८८१ सालीं त्या कालेजाशीं असलेला आपला संबंध सोडून, ते फ्रीचर्च कालेजांतील अध्यापकमंडळांत सामील झाले. तरी त्यांजकडे सिटी कालेजांतील प्रोफेसराची जागा होतीच. पुढें त्यांनीं आपलें स्वतःचें एक कालेज व एक हायस्कूल स्थापन करण्याचा विचार केला, व तो विचार १८८२ मध्यें त्यांनीं अमलांतही आणिला.

## रिपनकॉलेज.

बाबू सुरेंद्रनाथ यांच्यासारखा उत्कृष्ट अध्यापक कलकत्त्यांत ह्या वेळेपर्यंत एतद्देशीय लोकांत कोणी झाला नव्हता. त्यामुळें सर्व विद्यार्थ्यांचें बाबूसाहेबांविषयीं जें प्रेम वाढलें होतें तें अगदीं अपूर्व व अद्वितीय होतें. अनेक कालेजांतून त्यांनीं प्रोफेसराचें काम केलें असल्यामुळें सर्व विद्यार्थ्यांस त्यांचें सामर्थ्य व त्यांची योग्यता पूर्णपणें कळून, ते सर्व विद्यार्थी त्यांना प्रतिदेवतेसारखे समजूं लागले होते. बाबू सुरेंद्रनाथ यांचा विद्यार्थ्यांस शिकविण्याचा उत्साह, विद्यार्थ्यांविषयीं प्रेमसौहार्द, श्रमसोसकपणा, वक्तृत्व व लेखनचातुर्य, इत्यादि गुणांनीं ते एकंदर विद्यार्थीमंडळीस व त्यांच्या पालकवर्गास अधिकाधिक प्रिय होत चालले होते, ह्यांत आश्चर्य नाहीं. त्यांच्या सामर्थ्याचा व उल्हासाचा पुरुष लोकांमध्ये दुसरा कोणीच दिसत नव्हता. ते जसे उत्तम व सर्वप्रिय अध्यापक होते त्याचप्रमाणें ते सार्वजनिक कामांतही अंग मोडून, झटून, आणि मोठ्या कळकळीनें, आस्थेनें व निश्चयानें पडून, उद्दिष्ट कार्य नेटानें तडीस नेणारे असल्याचें सर्व लोकांच्या अनुभवास येत चाललें होतें. व यामुळें त्यांचेबद्दलचा सन्मान चोहोंकडे अतिशय वाढत चालला होता. अशी ही सोन्यासारखी वेळ आणूं म्हटल्यानें येण्यासारखी नव्हती, तेव्हां अशा वेळीं, आपण आपली स्वतंत्र संस्था स्थापन केल्यास ती स्थापन होण्यासारखी आहे असें त्यांस वाटून, त्यांनीं बौबझारमध्यें असलेल्या एका अप्रसिद्ध शाळेचा ताबा आपल्याकडे १८८२ च्या जानेवारींत घेऊन, तिचें नियंतृत्व स्वतः पतकरलें. त्या वेळीं त्या शाळेंत अवघे १०० विद्यार्थी होते. ही शाळा पुढें रिपन-हायस्कूल व रिपन कालेज या नांवानें प्रसिद्ध होऊन तिच्यामध्यें हल्लीं सुमारें २००० विद्यार्थी शिकत आहेत. हें कालेज व हायस्कूल कलकत्त्यांत पहिल्या प्रतीचें समजलें जातें. कोणत्याही हातीं धरलेल्या कृत्याविषयीं अश्रांत श्रम सोसण्याची ताकद व हौस, दीर्घोद्योगीपणा, त्या उद्योगास रंगारूपाला आणून त्याविषयीं सर्वत्र प्रीति व आस्था उत्पन्न करण्याची हातोटी, आणि जें काम करावयाचें तें अत्यंत मितव्ययानें, व अतिशय काळजीपूर्वक यथास्थित होण्याविषयींची दक्षता राखणें, हे जे कार्यकारी पुरुषामध्यें अवश्य गुण पाहिजेत ते बाबू सुरेंद्रनाथ यांचेठायीं निसर्गतःच पूर्णपणें वसत असल्यामुळें, त्यांच्या अंगीकृतकार्यांत सर्व प्रकारें त्यांना सिद्धि मिळत जाऊन त्यांजवरील लोकविश्वास उत्तरोत्तर दृढतर होत जावा, हेंच त्यांच्या थोर व उदात्त सुगुणशीलाचें सुफल होय, व त्या यशाचे फलभाक् ते झाले हेंच त्यांच्या सर्व परिश्रमांचें बीज होय.

बाबू सुरेंद्रनाथ यांच्या रिपन कालेजाची जी अल्प काळांतच भरभराट झाली तिचेबद्दलच बंगालच्या वरिष्ठ व श्रेष्ठ अधिकाऱ्यांनीं तारीफ केली असें नसून, ते अधिकारी ती तारीफ करतांना रिपन कालेकानाचे स्थापक आणि मालक बाबू सुरेंद्रनाथ यांच्या सामर्थ्याबद्दल व योग्यतेबद्दलही मोठी वाखाणणी करीत असल्याचें दरसालच्या बंगाल सरकारचे रिपोर्टावरून कळून येतें.

**रिपन कालेज संबंधानें मत.**

बंगालचे लेफ्टनेंट गव्हरनर सर स्टयूअर्ट बेले यांचे अध्यक्षतेखालीं ता० ३१ मार्च १८८८ रोजीं बाबू सुरेंद्रनाथ यांचे रिपन कालेजांतील विद्यार्थ्यांस बक्षिसें देण्याचा समारंभ झाला. त्या प्रसंगीं ह्या कालेजाची एकंदर सुस्थिति व सुव्यवस्था बघून तत्संबंधानें अध्यक्ष (सर स्टयूअर्ट बेले) यांणीं जें समाधानानंददर्शक भाषण केलें त्याचा सारांश असा होताः—“ रिपन कालेजासारख्या अत्यंत सुव्यवस्थित व यशस्वी संस्था चालू असलेल्या पाहिल्या म्हणजे, सरकारी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून अशा संस्थांस सर्व प्रकारचा योग्य आश्रय आणि उत्तेजन मिळत जावें हाच सरकारच्या राजकीय पद्धतींतील थोरपणाचा भाग असून, तेणेंकरून, लोकांकडे विद्यावृद्धीचें व वरिष्ठ शिक्षणाचें काम सोंपविण्यास कोणत्याही प्रकारें हरकत नाहीं असें दाखविल्यासारखें होऊन त्या कामांत उद्योगी व उत्साही लोकांसही उमेद आणण्याला कारण होणार आहे. ह्या संस्थेच्या वार्षिक हकीकतीचा लेख पाहून तर मला फारच समाधान वाटतें. ह्या कालेजांतील व शाळेंतील आणि शाळेच्या इतर शाखांतील विद्यार्थ्यांची संख्या किती तरी झपाट्यानें वाढत असून, त्या सर्वांच्या परीक्षांचे निकालही किती उत्तम झाले आहेत, आणि ह्यावरून ह्या संस्थेची उपयुक्तता वाढून तिची किती भरभराट होत आहे हें समजून येईल. ह्याबद्दलचें सर्व यश ह्या संस्थेच्या मालकांस, व्यवस्थापकांस व मुख्याध्यापकांस, म्हणजे बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी यांसच आहे, हें उघड आहे. कारण, हे तीनही अधिकार त्यांचेच असून, ही संस्था ह्याप्रमाणें पहिल्या प्रतीस आणून पोंचविण्यास त्यांचे श्रम, त्यांचा उत्साह, आणि त्यांची निष्ठा हींच कारण असून, त्यांबद्दल त्यांचें जितकें अभिनंदन करावें तितकें थोडेंच होणार आहे. रिपन कालेज व स्कूल ह्या संस्थेची नुसती पाहणी करणेंच किती तरी मेहनतीचें काम आहे! असें असून, ह्या संस्थेच्या आणखी दोन शाखा किदरपूर आणि हौरा येथें काढून, त्यांचीही व्यवस्था व पाहणी बाबू सुरेंद्रनाथ यांच्याकडून सुयंत्र राखली जात आहे. ही गोष्ट, बाबूसाहेबांचेकडून होणारीं इतर आणखी अनेक सार्वजनिक कामें, पत्रकर्तृत्व आणि अशाच बहुत उद्योगांच्या गोष्टी व व्यवहार हीं लक्ष्यांत ठेवून मनांत आणली म्हणजे, त्यांच्या कार्योत्साहीपणाचें, सामर्थ्याचें आणि उद्योगप्रियतेचें मोठें कौतुक व धन्यता वाटून आनंद झाल्याशिवाय कोणासही रहात नाहीं. ” वरील उद्गार बंगालच्या मुख्याधिकाऱ्यांचे आहेत हें लक्ष्यांत ठेविलें म्हणजे रिपन कालेजच्यासंबंधानें ह्यापेक्षां उत्तम दाखला दुसरा कोणता पाहिजे, असें कोणासही वाटणार नाहीं.

सर स्टयूअर्ट बेले यांच्या सदरील भाषणांत किदरपूर आणि हौरा येथील रिपनस्कूल शाखाच्या संबंधानें जो उल्लेख आला आहे त्याबद्दल येथें इतकेंच कळवावयाचें आहे कीं, बौबाझारमधील रिपनकालेज व स्कूल ही संस्था बाबू सुरेंद्र-

नाथ यांणीं चांगल्या व्यवस्थित पायावर स्थापन केल्यावर १८८६ मध्यें किदरपूर येथें त्या संस्थेची एक शाखा खुली केली, आणि पुढील वर्षी म्हणजे १८८७ सालीं त्यांणीं तशीच एक दुसरी शाखा हौरा येथें स्थापन केली. त्या दोन्ही शाखांत विद्यार्थ्यांची संख्या मोठी असून, तेथील शिक्षणक्रम, त्यांची व्यवस्था आणि त्यांचेविषयीं लोकप्रेम हीं, मुख्य रिपन कालेजाविषयीं असलेल्या लोकादराप्रमाणेंच आहेत, येवढें सांगितलें म्हणजे पुरें आहे. वरील दोनही शाखांत हौरा येथील शाखा तर फारच लोकप्रिय झाली असून तिची भरभराट अतिशय वाखणण्यासारखी आहे. ह्या दोनही शाखांची पाहणी बाबू सुरेंद्रनाथ हे प्रत्येक आठवडयांत नियमानें करून, आठवडयांतील नियमित दिवशीं ते स्वतः त्या शाळांतून वरच्या वर्गांस शिकवायालाही जात असतात. ह्या रिपन कालेजसंयुक्त संस्थेंत एकंदर सुमारें ३००० विद्यार्थी असून, तें एक लहानसें विश्वविद्यालयच बनलें आहे म्हटलें तरी हरकत नाहीं. आणि हें सर्व एका पुरुषाच्या उद्योगावेशाचें फल होय हें विशेष आहे !

## पत्रकर्तृत्व—" बंगाली " पत्राची उत्पत्ति.

इ. स. १८६१ सालीं कलकत्याचे प्रसिद्ध व लोकमान्य ब्यारिस्टर बाबू उमेशचंद्र बानर्जी व बाबू वाचाराम छत्रजी यांणीं " बंगाली " नांवाचें एक वर्तमानपत्र सुरू केलें; व त्यांचेकडूनच त्याची व्यवस्था रहात असे. त्या पत्रांत लिहिण्याचें काम, कलकत्यांत उत्कृष्ट म्हणून नांवाजलेले, लेखनपटु व हल्लींच्या नावाजलेल्या प्रवीण लोकांचे मुकुटमणी कै० बाबू गिरिशचंद्र घोष हे करीत असत. व त्यांचे साहाय्यास बाबू हरिश्चंद्र मुकरजी हे असत. बाबू गिरिशचंद्र घोष यांणीं बंगाली पत्राचें काम पहिलीं आठ वर्षें केलें. त्यांचेनंतर बाबू वाचाराम छत्रजी, कलकत्याचे माजी डेप्युटी माजिस्त्रेट कै० बाबू ताराप्रसाद छत्रजी, कै० बाबू राजकृष्ण मुकरजी एम. ए., बी. एल., आणि दुसरे कित्येक लेखनचतुर गृहस्थ बंगाली पत्राचें काम चालवीत होते व त्यांजकडून तें पत्र कायम राखण्यांत आलें होतें. पुढें बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी हे उत्कृष्ठ लेखक व वक्ते म्हणून कलकत्यास विशेष प्रसिद्धीस येऊन, त्यांच्याकडे बंगाली पत्राचें एकंदर कर्तृत्व व मालकी सोंपविली तर त्या पत्राची जी मुरूमुरू स्थिति होती ती कांहीं तरी सुधारून, त्या पत्राला योग्य मालकाच्या व कर्त्याच्या हवालीं केल्यासारखें होईल असें बाबू उमेशचंद्र बानर्जी व बाबू वाचाराम छत्रजी प्रभृतींच्या मनांत आलें. बाबू सुरेंद्रनाथ यांसही आपल्याकडून कांहीं तरी वाणीनें व लेखणीनें देशसेवा होऊन लोकांचें आलस्य व मोहनिद्रा घालवून त्यांना चैतन्य व जागृति आणावी अशी इच्छा होऊन, आपल्या हातांशीं एखादें वर्तमानपत्र येईल तर पहावें असा त्यांचाही विचार होता. बंगाली वर्तमानपत्राला कोणी हातीं घेणारा मनुष्य मिळाल्यास त्याचे स्वाधीन तें पत्र करण्याची त्याच्या मालकांची इच्छा आहे असें सुरेंद्रनाथ बाबूंस कळल्यावर त्याप्रमाणें त्यांनीं आपला हेतु सदर पत्रकर्त्यांस व मालकांस कळविला. व तो त्यांचा हेतु ऐकून त्यांनीं तावडतोब त्यांना त्या पत्राची मालकी व कर्तृत्व देण्याचें ठरवून त्यांचे स्वाधीन पत्र व छापखाना केला. त्या वेळीं बंगाली पत्राला सरासरी काय तें शंभर वर्गणीदार होते. बंगाली पत्राची मालकी व कर्तृत्व बाबू सुरेंद्रनाथ यांणीं आपल्याकडे घेईपर्यंत कलकत्यास एकही पत्र इंग्लंडांत

शिक्षण घेऊन इंग्रजी भाषेचें नैपुण्य मिळविलेल्या एडिटराकडून चाललेलें नव्हतें. तो अपूर्व लाभ बंगाली पत्राला मिळून तें पत्र ऊर्जितदशेला येण्याचा योग आला. येणेंप्रमाणें बंगाली पत्राला, विलायतेस राहून तयार व हुशार झालेले कर्ते मिळाले एवढाच फायदा मिळाला नाहीं; तर ते कर्ते जसे उत्कृष्ठ व लोकप्रिय लेखनचतुर होते तसेच ते अप्रतिम वक्ते व सार्वजनिक कामांस वाहिलेले असे करारी, देशैकनिष्ठ व अभिमानी पुरुष होते. पत्रकर्त्यांमध्यें अशा गुणांचें वास्तव्य अवश्य असावयास पाहिजे; परंतु ते सर्व गुण एकाच पत्रकाराचे अंगीं असलेले क्वचित् दृष्टीस पडतात. बाबू सुरेंद्रनाथ याची गोष्ट तशी नव्हती. ते जसे वाणीचे खंबीर म्हणून प्रसिद्ध झाले होते तसेच ते लेखणीचेही सणसणीत होते. आणि ह्यामुळें त्यांच्या पत्रकर्तृत्वांत लोकप्रियता अधिक येण्याचा संभव होता. आणि पुढें लवकरच तसा अनुभव आला. ज्या वेळीं बंगाली पत्राचें स्वामित्व व कर्तृत्व बाबूसाहेबाकडे गेलें त्या वेळीं त्याचे वर्गणीदार अवघे सुमारें १०० होते म्हणून वर कळविलेंच आहे. पण पुढें दोनच वर्षांनीं म्हणजे १८८० सालीं त्याच बंगाली पत्राचे सुमारें दीड हजार वर्गणीदार झाले.

बंगाली पत्राचे कर्ते म्हणजे असामान्य व बहूद्योगी गृहस्थ आहेत. बाबू सुरेंद्रनाथ हे उत्कृष्ठ अध्यापक, पुढारी, कारस्थानी व मुत्सद्दी, कळकत्त्याचे नगरपिते ( म्युनिसिपल कमिशनर ) आणि सन्माननीय ( ऑनररी ) माजिस्ट्रेट आहेत. आणि इतके उद्योग व तितक्या निरनिराळ्या योग्यता राखून त्या त्या व्यवसायास योग्य, गंभीर, निःस्पृहपणाचे आणि सत्यप्रतिपादनाचे लेख आपले पत्रांत लिहिण्याविषयीं-ची त्यांची दक्षता वर्णनीय व प्रशंसनीय अशीच सर्वांचे अनुभवास आली. बहुतेक सर्व खात्यांत आणि लोकोपयोगी संस्थांत रुळलेला व वापरलेला असा अनुभविक पत्रकर्ता जे लेख लिहील ते, विशेष विचाराचे, उचित प्रतिपादनाचे आणि शक्य तितक्या सुधारणा व फेरबदल बेताबातानें सुचविणारे आणि अशाच रीतीनें सर्व प्रकारच्या व व्यवसायाच्या लोकांस विशेष मनन करण्यासारखे व इतर लेखांपेक्षां अधिक योग्यतेचे वाटणें साहजिक आहे. बाबू साहेबांचें बंगालीपत्र प्रति शनवारीं सकाळीं प्रसिद्ध होतें. व ह्यामुळें आठवड्यांतील शुक्रवारचा दिवस हा त्यांचा अतिशय कामाचा व क्षणाचीही फुरसत न देणारा असा असतो. तरी आपलीं रोजचीं नियमित कामें यथास्थित करून बाबूसाहेबांकडून पत्राला मजकूर लिहिण्याचें काम अस्खलित व वेळेवर होण्यास चुकत नाहीं. कधीं कधीं तर असें पाहण्यांत येतें कीं, शुक्रवारीं सायंकाळपर्यंत ते सार्वजनिक महत्वाच्या कामांत अगदीं गुंतलेले राहून, सर्व दिवसभर शहरांत इकडे जा, तिकडे फीर, अशा रीतीनें त्यांची चळवळ एकसारखी चाललेली असते; व सायंकाळच्या वेळीं, कलकत्त्याच्या टाउनहालांत ते त्या चळवळीच्या कामासाठीं भरलेल्या प्रचंड सभेपुढें श्रांत होऊन जाण्यासारखें व सर्व सभासदांस दंग करून टाकणारें असें जंगी व्याख्यान देऊन, नंतर तसेच सात वाजतां ते बंगालीच्या आफिसांत जाऊन त्या चालू विषयावर सुंदर निबंध व इतर विषयांवर लेख लिहून देण्यास एकसारखे जे खुर्चीवर बसतात ते पहांटे ३ वाजतां पत्राचें शेवटचें प्रुफ बघून सकाळीं स्वस्थ आपल्या घरीं विश्रांत्यर्थ निद्रासुख घेण्यासाठीं जातात. ही त्यांची उद्योग-

निरतता व व्यवसायमग्नता अत्यंत असा रण व थक्क करून टाकण्यासारखी आहे बाबूसाहेब हे सर्व उद्योग पैशाच्या आशे व द्रव्यलोभामुळें करीत असतील असें कोणी म्हणतील, पण तसें नसून, असें व्यवसा व्यापृत राहण्याची त्यांना अतोनात हौ आहे; अथवा तें त्यांना जबरदस्त व्यसन लागलें असल्यामुळें, त्यांचा सर्वकाळ अश रीतीनें नेहमीं उद्योगांत जुंपलेला व गुंतलेल आपल्या दृष्टीस पडतो, हें ध्यानांत ठेवावें.

**त्यांची राजकार्यांतील मुत्सद्दिगिरी.**

हिंदुस्थानांत चाललेल्या एकंदर कारस्थ नाच्या कायदेशीर चळवळींचे बुडाशीं बाबू सुरेंद्रनाथ यांचा हात व मदत असावयाची असें सिद्धवद्गृहीत धरून कोणीही चाल त्यास त्यांत कांहीं चूक होणार नाहीं कारण, या देशातल्या अशा मोठमोठ्या चळवळींना त्यांणीं आपलें आयुष्य आणि आपला आत्मा केवळ वाहिलेला आहे व ही गोष्ट त्यांचे कोणी शत्रु असतील तर त्यांनाही नाकबूल होणार नाहीं. ह्या देशांत इंग्रजी उदार शिक्षण देण्याचा प्रचार प्रथमतः बंगाल्यांत प्रसिद्ध डेव्हिड हेअर यांच्यासारख्या सन्मान्य, विद्याभक्त व शिक्षणप्रिय गृहस्थांचे कडून सुरू होऊन, त्यांचे मुत्सद्दिगिरींतील पहिले आणि आरंभीचे साच्छिष्य व अग्रेसर म्हणून प्रसिद्धीस आलेले बाबू रामगोपाळ घोष आणि रेवरेंड कृष्णमोहन बानर्जी हे होत. आणि मूळ इकडे राजकीय कामाचे संबंधानें पद्धतशीर व कायद्यानरहुकूम चळवळी करण्याची सुरुवात त्यांनींच केली अशी बंगाल्यांत प्रसिद्धि आहे. त्यांचे मागून राजकारस्थानांत चळवळ करणारे म्हणून बाबू हरिश्चंद्र मुकर्जी, कृष्णदास पाल आणि त्यांचे इतर कित्येक मित्र प्रसिद्धीस आले. त्या सर्वांचीं येथें नांवें देण्यानें विस्तार मात्र होईल. ह्या राष्ट्रीय दास्यमोचनकार्याची इमारत फार प्रचंड असून ती उभारण्यास ह्या देशांतील शेंकडों तर काय परंतु हजारों मुत्सद्यांचे हात लागले पाहिजेत; व त्याप्रमाणें वरील कारस्थानी गृहस्थांकडून त्यांच्या त्यांच्या अस्तित्वांत पुष्कळ चळवळी झाल्या असून त्यांनीं राजकीय चळवळीचा पाया शुद्ध रीतीनें व चांगला मजबूत केला, ह्यांत संशय नाहीं. परंतु बाबू सुरेंद्रनाथ यांनीं ह्या चळवळीला जें सार्वत्रिक रूप देऊन चोहोंकडे तोच विषय सर्वांना परिचित केला असा प्रकार पूर्वीं कधीं कोणाकडून झाल्याचें माहीत नाहीं. वर सांगितलेल्या मुत्सद्दी मंडळीनें एकाच दिशेनें ह्या राजकीय चळवळीस सुरुवात केली होती. परंतु सुरेंद्रनाथ यांची चळवळीची दिशा एकच नाहीं. त्यांनीं अनेक दिशांनीं ती केली आहे. वर लिहिल्याप्रमाणें प्रारंभींच्या मुत्सद्यांनीं जी राजकीय चळवळ केली ती कांहीं थोड्या व नियमित लोकसमुदायांतच केली; परंतु सुरेंद्रनाथ बाबूंची चळवळ म्हणजे सर्व देशांत आबालवृद्धांमध्यें एकसारखी झाल्यामुळें ती सर्वांस कळून चुकली आहे. रामगोपाळ घोष, हरिश्चंद्र मुकर्जी अथवा कृष्णदासपाल यांच्यासारखे पहिले मुत्सद्दी यांणीं ह्या देशांतलीं मुख्य मुख्य अशीं थोडींच नगरें फिरून व त्यांतीलही बुद्धिमान् व विद्वान् लोकांत हिंडून जी चळवळ करावयाची ती करण्याचा परिपाठ घातला. परंतु सुरेंद्रनाथ बाबूंनीं जें राजकीय चळवळीचें शिक्षण व ज्ञान ह्या देशांत प्रसृत केलें तें, सर्व हिंदुस्थानांत चोहोंकडे हिंडून व साधारण शाळेंत व कालेजांत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांपासून तों मोठमोठ्या कारस्थान्यापर्यंत, सर्वांमध्यें व्याख्यानें देऊन व अनेकांशीं संवाद करून, पसरिलें. राजकीय चळवळीचें ज्ञान आपल्या अज्ञान

देशबंधूंना यथार्थ रीतीनें व्हावें म्हणून तें, बाबू सुरेंद्रनाथ यांणीं शहरोंशहरीं व गांवोंगांवीं हिंडून, व्याख्यानद्वारां, अविश्रांत श्रम सोसून, दिलें. व त्याचें बीज चोहोंकडे पेरिलें. आणि असें करण्यांत त्यांणीं कधींही व कोठेंही ऊन, तहान, थंडी, वारा, सोय, गैरसोय, क्षुधा, उपवास इत्यादि कांहीं एक मनांत न आणितां व अशा प्रकारच्या शरीरव्ययांस न जुमानतां किंवा त्यांची बिलकूल पर्वा न करितां, सर्व बंगालप्रांतच नव्हे–तर, सर्व हिंदुस्थान देश म्हटला तरी चालेल–हालवून व जागा करून सोडला, आणि कित्येक वर्षांची सर्व देशबंधूंच्या अंगीं खिळून राहिलेली तंद्रा व आलस्य हीं पुष्कळ अंशांनीं घालवून देण्याचा एकसारखा व अव्याहत यत्न चालू ठेविला, ही गोष्ट सुरेंद्रनाथ बाबूंच्यासंबंधानें विशेष ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. ते ह्या राष्ट्रकार्यासाठीं दक्षिण हिंदुस्थानांत मद्रासपासून उत्तरेकडे व वायव्य दिशेस मुलतान आणि रावळपिंडीपर्यंत; आणि पूर्वेकडे डाक्यापासून पश्चिम हिंदुस्थानांत पुणें, अमदाबाद व सुरतपर्यंत, ह्याप्रमाणें, ह्या देशांतील चारही दिशांकडे प्रसिद्ध असें व चळवळ करण्यासारखें बहुतकरून एकही शहर न सोडतां, त्या प्रत्येक शहरीं त्यांणीं राजकीय चळवळीबद्दल कांहींना कांहीं तरी भाषणें करून लोकांमध्यें चैतन्य उत्पन्न करण्याचें मोठें काम केलें. व हें जें त्यांणीं काम केलें तें निःसंशय असाधारण व असामान्य होय. मध्ययुगांत ख्रिस्तीधर्मप्रसारार्थ प्रेषित व शुभवार्तिक आणि त्याचप्रमाणें साधु व जोगी शरीरसुखाची तादृश पर्वा न करितां पृथ्वीवरील भागावर चोहोंकडे एकसारखे फिरत असत. तेंच व्रत धारण करून, सुरेंद्रनाथ बाबूंनीं राजकीय चळवळ व ऐक्य लोकांमध्यें जागरूक राहण्यासाठीं, तसेंच श्रम व कष्ट सोसून, आपले हक्क, आपले अधिकार, मानवी स्वातंत्र्य आणि राष्ट्रीयपरवशता, यांचें स्वरूप आपल्या सर्व देशबंधूंपुढें मूर्तिमंत उभें करण्याचें मोठें स्पृहणीय यश संपादन केलें. व हें त्यांचे आयुश्चरित्रांत घडलेल्या अनेक महत्कार्यांतील एक प्रमुख कार्य आहे, हें वाचकांनीं लक्ष्यांत वागविण्यासारखें आहे.

## त्यांजवरील आणखी एक प्रसग--कोर्टाचा अपमान केल्याबद्दलचा आरोप.

प्रसिद्ध इंग्रजी ग्रंथकार कार्लाइल याणें एके ठिकाणीं असें म्हटलें आहे कीं, "The greatest man is he who can bear the heaviest weight of misfortune without staggering." म्हणजे, अतिशय कठिण दैवदुर्विलासाचें ओझें सोसून जो यत्किंचितही डगमगत नाहीं तोच थोर मनुष्य होय. आणि अशा प्रकारच्या कसोटीस उतरण्याचा प्रसंग बाबू सुरेंद्रनाथ यांस त्यांच्या पत्रकर्तृत्वाचे कामांत आला. सुरेंद्रनाथ बाबूंच्याशिवाय इतर कोणा कोत्या धैर्यविचाराच्या पत्रकारावर जर हा असा प्रसंग आला असता तर त्याला, या अशा प्रसंगानें आपली अत्यंत अपकीर्ति होऊन आपल्याला जन्माचा काळिमा लागला असें वाटून, तो शरमेनें, आपल्या एकंदर सार्वजनिक कर्तव्यांपासून परावृत्त झाला असता. आणि त्याची अशा अत्यंत अपमानानें कमर खचून जाऊन त्याणें निराशेनें व औदासीन्यानें आपले व्यवहार कांहीं काळपर्यंत तरी एकीकडे ठेवून एकांतांत दिवस घालविले असते. परंतु बाबू सुरेंद्रनाथ हे अशा विलक्षण अपमानकारक दिव्यांतून इतक्या यशस्वितेनें बाहेर पडले कीं, त्या प्रसंगानें जणूं काय त्यांचा नैसर्गिक आवेश, देशप्रीति, कर्तव्यतत्परता आणि सर्व प्रकारच्या आशा व

उमेदी हीं एकंदर अधिक उज्ज्वलित व प्रखर झालीं. आणि त्यांच्या पहिल्या कीर्तीमध्यें व लोकप्रीतीमध्यें अधिक भर पडून ती पहिल्यापेक्षां दुणावली. राखेनें अंधुक झालेला निखारा त्याला हालविल्याबरोबर आपलें भस्मकवच टाकून जसा प्रखर व तेजस्वी होतो, अथवा नागाला अंमळसें डिवचलें ह्मणजे तो आपली फडा पसरून जसें आपलें खरें स्वरूप दाखवून लोकांमध्यें भीति, दरारा व भक्ति उत्पन्न करितो, त्याप्रमाणें, बाबू सुरेंद्रनाथ या पुरुषावर जों जों अशीं संकटें भोगण्याचे प्रसंग गुजरत गेले तों तों ते अधिकाधिक धैर्योत्साहाच्या कसोटीस उतरून, त्यांचें तेज लोकदृष्टीला अधिकाधिक देदीप्यमान् भासूं लागलें सुरेंद्रनाथ बाबूंवर हा असा कोणता प्रसंग आला तो शिरोलेखांत दर्शविलाच आहे. आतां त्या प्रसंगाच्या साद्यंताची थोडक्यांत हकीकत सांगतों, म्हणजे बाबूसाहेबांच्या निष्कलंक व अखंड वृत्ति, उत्साह, निर्भयता आणि स्वकर्तव्यपरायणता इत्यादि सुगुणमालेच्या प्रमोदाल्हादकारक परिमलाला एतद्देशीय जनभृंग कसे व कां लुब्ध व्हावे व होतात याचें कारण वाचकांच्या लक्ष्यांत येईल. त्या प्रसंगाची हकीकत अशी:—

ता० २८ एप्रिल १८८३ ह्या दिवशीच्या बंगाली पत्रांत, कलकत्त्यास त्या काळीं प्रसिद्ध होणाऱ्या "ब्राम्ह पब्लिक ओपिनियन" नांवाच्या वर्तमानपत्राचे आधारें बाबू सुरेंद्रनाथ यांणीं एक लेख प्रसिद्ध केला. त्या लेखांतील आशय असा होता कीं, कलकत्ता हायकोर्टाचे एक जज्ज, नामदार मि० जस्टिस नॉरिस, यांनीं एका खटल्यांत हिंदु लोकांची एक शालिग्राममूर्ति पुराव्याकरितां आपल्या समोर हायकोर्टांत आणविली. वरील ब्राम्ह पब्लिक ओपिनियन पत्र कलकत्ता हायकोर्टांतील एक देशी अटर्नी चालवीत असत. तेव्हां, त्यांच्या पत्रांत ज्या रीतीनें शालिग्राममूर्तीसंबंधाची गोष्ट प्रसिद्ध झाली ती गोष्ट सर्व खरीच असावी अशी बाबू सुरेंद्रनाथ यांची साहजिक समजूत झाली. त्याचप्रमाणें, सदर पत्रांत शालिग्राममूर्तीसंबंधी हकीकत प्रसिद्ध झाल्यावर तिचे विरुद्ध अथवा तिच्या असत्यत्वाबद्दलही कोठें कांहीं एक प्रसिद्ध न झाल्यामुळें त्या बाबतींत खरेपणाविषयीं बाबू साहेबांस मुळींच संशय न राहून, हिंदु धर्माचा उपहास होण्यासारखी जी गोष्ट नामदार नॉरिस साहेबांकडून घडली तिजबद्दल सुरेंद्रनाथ यांस अर्थात् वाईट वाटून, शुद्ध बुद्धीनें व निष्प्रांजलपणें जें लिहिणें योग्य होतें तें त्यांनीं लिहून आपल्या पत्रांत प्रसिद्ध केलें. त्यांत मि० जस्टिस नॉरिस अथवा हायकोर्ट यांचा अपमान करावा अशा हेतूनें त्यांणीं तो लेख मुळींच लिहिला नव्हता, असें त्यांणीं प्रतिज्ञेवर जबाब देतांना कोर्टापुढेंही सांगितलें. ह्या लेखांतील भाग मि० जस्टिस नॉरिस यांस लागण्यासारखा जेवढा होता त्यांतील आशय एवढाच होता कीं, "जेफ्रे आणि स्क्रॉग् यांच्या वेळचेच दिवस आले आहेत असें जरी दाखविण्याचा ह्या जज्जांचा इरादा नसला तरी त्यांणीं आपल्या थोडया दिवसांच्या अवधींत जो आपला वर्तनक्रम दाखविला तेवढयावरून त्यांणीं जें केलें तें, ते दिवस आले असें सिद्ध होण्यास बस्स आहे; आणि या थोडया मुदतींत त्यांजकडून हायकोर्टामध्यें जें काम झालें त्यावरून ते त्या कामास किती अयोग्य आहेत हें दिसून येतें."

हा लेख बंगाली पत्रांत प्रसिद्ध होऊन चार दिवसही झाले असतील नसतील; ता० २ मे रोजीं मि० जस्टिस नॉरिस यांणीं दुपार-

च्या उपाहार झाल्यानंतर कोर्टांत येऊन, बंगाली पत्रांत आपल्यावर जो आरोप केला आहे तो खोटा आहे, व आपण, आपल्यापुढें चालू असलेल्य खटल्यांतील दोन्ही बाजूंच्या पक्षकारांकडून त्याचें संमत नसतां व एकंदर हिंदुलोकाना वाईट वाटेल याचा विचार न करितां, शालिग्राममूर्ति कोर्टांत आणविली असें म्हटलें आहे तें असत्य आहे, असें बोलून दाखविलें. व त्याच वेळीं बंगालीचे एडिटर बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी व त्या पत्राचे प्रिंटर बाबू रामकमार दे यांस, तुम्हीं कोर्टाचा अपमान केला ह्यासाठीं तुम्हाला शासन कां करूं नये? ह्याचें कारण दाखवा, अशा अर्थाची नोटिस आपल्या सहीनें काढून, त्या नोटिशीचा जबाब देण्यास अवधी दोन दिवसांची मुदत दिली होती. त्याप्रमाणें ता० ४ मे रोजीं कलकत्त्याचे सुप्रसिद्ध ब्यारिस्टर बबू उमेशचंद्र बानर्जी व त्यांचे साहाय्यार्थ तेथील प्रसिद्ध व हुशार अटर्नी बाबू गणेशचंद्र चंद्र असे बाबू सुरेंद्रनाथ यांचे वतीनें जबाब देण्यास हायकोर्टांत हजर झाले. व त्यांणीं असें कळविलें कीं, बंगालीपत्रांत जो मजकूर प्रसिद्ध झाला आहे तो सद्बुद्धीनें आणि लोककल्याणाचे हेतूनें लिहिलेला आहे. बाबू सुरेंद्रनाथ यांचे तर्फे येवढें सांगितल्यावर खुद्द बबू साहेबांनीं आपल्याकडून असा मजकूर लिहून प्रसिद्ध झाल्याबद्दल खेद प्रदर्शित केला व त्याबद्दल कोर्टाची माफी मागितली. परंतु ती माफी कोर्टानें कबूल केली नाहीं; आणि ह्या प्रकरणाचा निकालई फार घाईनें करण्यांत येऊन, दुसरे दिवशीं सकाळीं निकालपत्र देण्यात आलें. त्यांत बाबू सुरेंद्रनाथ यांस दिवाणी तुरुंगाची म्हणजे साध्या कैदेची दोन महिन्यांची सजा कळविण्यांत आली. ह्या आरोपास कैदेची शिक्षा न देतां दंडाची शिक्षा देतां आली असती. परंतु दंडाची शिक्षा म्हणजे नुसती नांवाला शिक्षा दिल्यासारखी झाली असती असें जज्जांना वाटून, त्यांजकडून त्यांस ऐनजिनसी शिक्षा मुद्दाम देण्यांत आली. ह्या खटल्याचा निकाल करण्यास हायकोर्टाचे पाचही जज्ज बसले होते. ते जज्ज म्हणजे—नामदार सर रिचर्डगार्थ, चीफ जस्टिस, मि. जस्टिस कानिंघम, मि. जस्टिस म्याक्डोनेल, मि. जस्टिस नॉरिस आणि मि० जस्टिस रमेशचंद्र मित्र—हे होते. यांतील पहिले चौवेही युरोपियन जज्ज एका मताचे असून शेवटचे मि० जस्टिस मित्र यांचें मत पहिल्या चौघां जज्जांहून भिन्न होतें. व त्यांनीं तें आपलें मत वेगळें लिहून दिलें. त्यांत त्यांनीं स्पष्टपणें असें कळविलें कीं, मागें अशाच "कोर्टाचे अपमानाच्या" दोन खटल्यांत माफीचा स्वीकार करून निकाल दिला होता; तसाच निकाल ह्याही खटल्यांत द्यावा, असा माझा अभिप्राय आहे. न्यायमूर्ति रमेशचंद्र मित्र यानीं आपल्या म्हणण्यास पुराव्यासाठीं जे दोन निकाल घेतले होते त्यांत पाटणाचे कमिशनर मि० वुइल्यम टेलर आणि इंग्लिशमन पत्राचे एडिटर क्याप्टन फेन्विक् ह्या दोघांवर, बाबू सुरेंद्रनाथ यांचे वर आणलेल्या आरोपाप्रमाणेच आरोप असून, त्यांबद्दलची चौकशी चालू असतां त्यांस असें सुचविण्यांत आलें होतें कीं, तुम्ही झालेल्या अपराधाबद्दल माफी मागितली तर ती स्वीकारण्यांत येईल. आणि त्याप्रमाणें त्या दोघानीं माफी मागितल्यावर त्यांस सोडून देण्यांत आलें. (पहा, हाइड्चा रिपोर्ट, पान ७९)." त्याप्रमाणेंच ह्या खटल्यांतही न्याय देणें गैरवाजवी होणार नाहीं. येथे तर बाबू सुरेंद्रनाथ यांणीं कोर्टाकडून सूचना मिळण्याचे अगोदरच आपली माफी सादर

केली आहे, तेव्हां तिचा स्वीकार व्हावा हे योग्य आहे." परंतु हें रमेशचंद्र यांचें म्हणणें त्यांचेजवळच राहिलें. बंगालीपत्राचे प्रिंटर बाबू रामकुमार दे यांचेबद्दलची सर्व जबाबदारी बाबू सुरेंद्रनाथ यांणीं आपल्यावर घेतल्यामुळें, जज्जांनीं त्यांस निर्दोषी ठरवून, वर कळविलेली दोन महिन्यांची साध्या कैदेची शिक्षा मात्र बाबू सुरेंद्रनाथ यांस सुनावण्यांत आली. व ती त्यांनीं शांतपणें आणि मन अस्वस्थ न होऊं देतां ऐकिली. आपल्यावर आलेल्या तोहमतीच्या निकालाचें स्वरूप कसें काय आहे याचें धोरण बाबू सुरेंद्रनाथ यांस अगोदरच समजून चुकलें होतें व त्याप्रमाणें त्यांची सिद्धता होती. ते मणिरामपूर येथून आपल्या घरून आपल्याला कैदेची शिक्षा होईल ती सोसण्याच्या तयारीनेंच निघून कलकत्त्यास गेले होते! त्यांणीं मणिरामपुराहून निघतांना, आपल्याला कैदेची शिक्षा होणार आहे असें पूर्णपणें अनुमान करून, कैदेंत गेल्यावर येथें वाचण्यासाठीं आवडीचीं पुस्तकें, बेताचे कपडे व हातरुमाल वगैरे अवश्य लागणाऱ्या वस्तु—केश विंचरण्याचा कंगवा व कपडे झाडण्याचा ब्रश हीं सुद्धां—आपल्याबरोबर आपल्या प्रवासी थैल्यांत घेतल्या होत्या. त्यांनीं आपल्याबरोबर आपला बिछाना मात्र घेतला नव्हता. कारण, त्यांना असें वाटलें कीं, कैदेंत गेल्यावर तेथें कैदेंतला ठरीव बिछाना आपल्याला मिळेलच. सारांश, इतक्या तयारीनें व मनाच्या सिद्धतेनें जे गृहस्थ आपल्या घरून घरच्या माणसांचा निरोप घेऊन निघाले होते, त्यांणीं, जज्जांनीं सांगितलेला निकाल शांततेनें, गंभीरपणानें व स्वस्थांतःकरणानें ऐकिला हें विशेष झालें असें सांगायला नकोच. बाबूसाहेबांस शिक्षा सुनावल्यावर ते, ज्या दरवाज्यानें जज्ज कोर्टांत जातात येतात त्या दरवाज्यानें बाहेर पडले; व नेहमींच्या कैदी नेण्याच्या गाडींतून त्यांना तुरुंगांत न नेतां, त्यांचे बरोबर मि० ब्रौन नांवाचे एक हा. को. चे बेलिफ यांस देऊन, नदीच्या काठानें एका स्वतंत्र गाडींतून प्रेसिडेन्सी तुरुंगांत नेऊन पोंचविलें. कोर्टांतून बाबू सुरेंद्रनाथ यांस बाहेर काढून तुरुंगाकडे नेण्यांत आलें, हें कोर्टाबाहेर जी अतिशय गर्दी जमली होती तिला, कांहींएक कळलें सुद्धां नाहीं. पुढें बऱ्याच वेळानें जमलेल्या लोकांस समजलें कीं, बाबूसाहेबांस जज्जांच्या जाण्यायेण्याचे दरवाज्यानें कोर्टांतून बाहेर काढून नदीच्या काठानें तुरुंगांत नेऊन पोंचविण्यांत आलें, तेव्हां ती वार्ता ऐकून सर्व लोक अत्यंत दुःखित होऊन आपापल्या घरीं गेले!

## लोकांची हळहळ!

बाबू सुरेंद्रनाथ यास मि० जस्टिस नॉरिस यांणीं, कोर्टाचा अपमान केल्याबद्दल तुम्हांवर प्रकरण चालवून तुम्हांला शासन कां करूं नये? याचा जबाब दे याबद्दलची नोटिस काढून समन्स दिल्याचे प्रसिद्ध झाल्या दिवसापासून तें त्यांना शिक्षा सांगून तुरुंगांत पाठवीपर्यंत सर्व देशांत चोहोंकडे मोठा, गवगवा झाला. सुरेंद्रनाथांच्या अंगच्या अनेक बहुमोल गुणाची कीर्ति ह्या सर्व देशांत चोहोंकडे अगोदरपासूनच दुमदुमून राहिली असल्यामुळें त्यांचेवर असला विलक्षण प्रसंग आला हें ऐकून सर्वत्र दुःख व खेद उत्पन्न होऊन, हिंदुस्थानच्या सर्व भागांतून सुरेंद्रनाथाविषयीं हळहळ दाखविण्याच्या तारा व पत्रें यांचा त्यांजकडे जणूं काय एकसारखा सेतु बांधण्यांत आला होता, असें म्हटलें तरी चालेल. सुरेंद्रनाथांचे अनेक थोर गुण लोकांचेपुढें मूर्तिमंत उभे अ-

सल्यामुळें प्रत्येक ठिकाणीं लोकांस असें वाटलें कीं, आपण त्यांचेकरितां काय केलें असतां त्यांवर आलेल्या प्रसंगांतून त्यांची सुटका होईल ! खुद्द कलकत्त्यास आबालवृद्धांमध्यें सुरेंद्रनाथांवर आलेल्या संकटाचे संबंधानें जें अस्वास्थ्य उत्पन्न झालें तें अवर्णनीय होतें. त्यांचें अनुपमेय वक्तृत्व, त्यांच्या वर्तनांतला भलेपणा, त्यांची श्रमालुता, त्यांचें अप्रतिम व उदाहरण घेण्यासारखें अध्यापकत्व, त्यांची म्युनिसिपल कमिशनरच्या नात्यानें कर्तव्यपटुता, त्यांचें सर्व प्रकारच्या राजकीय चळवळींसंबंधानें अग्रेसरत्व आणि सर्वांत विशेष जी त्यांची देशकार्यतत्परता यांचेमुळें त्यांच्यासंबंधानें लोकांचा जो विलक्षण प्रेमभाव होता त्या प्रेमभावाला ह्या वेळीं अधिकच भरती येऊन, सर्वांना त्यांच्या ह्या अशा अकल्पित संकटकालाचे योगानें अतिशयच दुःख झालें ! ज्या दिवशीं त्यांस कोर्टामध्यें कैदेची शिक्षा सांगण्यांत आली त्या दिवशीं हायकोर्टाचे बाहेर सुमारें चार हजार लोक जमले होते. त्यांना हायकोर्टांत जाण्याची परवानगी मिळाली नाहीं; कारण, त्यांजकडून कोर्टांत गडबड होईल अशी कोर्टाचे अधिकाऱ्यांस भीति होती. आणि, या जमलेल्या गर्दीकडूनच सुरेंद्रनाथांस तुरुंगांत नेतांना कांहीं तरी अडथळा व हरकत येईल, अशा समजुतीनें, ती गर्दी टाळून, त्यांना मुद्दाम दुसऱ्याच असाधारण रस्त्यानें व विशेष बंदोबस्तानें कोर्टांतून काढून नेलें. त्यानंतर पुढें काय काय घडलें तें आम्ही ह्यापुढें, त्या वेळीं प्रसिद्ध झालेल्या इंडियन एम्पायर नांवाच्या पत्रांत जी हकीकत प्रसिद्ध झाली होती तिचाच सारांश देतों म्हणजे झालें. वरील पत्रकार म्हणतात:—

"लार्ड वुइल्यम बेंटिकच्या कारकीर्दीपर्यंतच्या मागच्या काळाची ज्यांस आठवण आहे असे कित्येक वृद्ध लोक आज जीवमान् आहेत त्यांच्या स्मरणांत सुद्धां, सुरेंद्रनाथ बानर्जींच्यावर ता० ५ मे रोजीं जो कैदेचा प्रसंग आला व त्यामुळें कलकत्ता शहरांत जो एकंदर हवलदीलपणा, जें अस्वास्थ्य, आणि जी चळवळ पसरली, तशी स्थिति पूर्वीं कधींही व कोणत्याही प्रसंगीं आलेली कोणासही आठवत नाहीं. पहिल्यांदा कित्येक लोकांना—विशेषेंकरून आंग्लो-इंडियन पत्रकारांना—असें वाटलें कीं, ही चळवळीची स्थिति बाबू सुरेंद्रनाथ तुरुंगांत पोंचून दाखल होतपर्यंतच चालून, मग चोहोंकडे शांतता व उदासीनता नेहमींप्रमाणें लोकांचे मनावर आपला अंमल करील. परंतु ही ज्यांची समजूत होती त्यांना ती आपली समजूत खोटी असल्याचें लवकरच अनुभवास आलें. बाबू सुरेंद्रनाथ यांचे संबंधाची चळवळ व हळहळ प्रतिघंटेस वाढत जाऊन, रानांत पेटलेला वणवा ज्याप्रमाणें प्रतिक्षणीं अधिकाधिक प्रदेश व्यापीत जातो त्याप्रमाणें, सर्व हिंदुस्थान देशांत आठही दिशांकडे ह्या चळवळीनें सर्व लोकांचीं मनें आपल्याकडे ओढून घेतलीं. सर्व जातिधर्मांचे, श्रीमंत गरीब, वृद्ध तरुण आणि सर्व मतांचे व धंद्यांचे लोकांमध्यें ह्यासंबंधानें एकसारखी चळवळ होऊन फार गवगवा माजला. हिंदुस्थान देशाच्या अवघ्या द्वीपकल्पांत, येथून तेथवर, बहुतकरून प्रत्येक विशेष प्रसिद्धीच्या शहरांतून, बाबू सुरेंद्रनाथ यांच्यावरच्या प्रसंगाबद्दल अतिशय दुःख, हळहळ आणि रोष उत्पन्न झाला, व प्रत्येक ठिकाणीं प्रत्येकास आपल्या कुटुंबांतील अत्यंत प्रियकर व पुरस्कर्त्या पुरुषाचे संबंधानेंच कलकत्ता हायकोर्टाकडून हा अन्याय झालेला आहे, असें वाटूं लागलें !

ह्या देशांतील प्रत्येक सुशिक्षितास बाबूसाहेबांच्यासंबंधाचे असमाधानकारक वर्तमानामुळें दुःख व खेद झाल्यावांचून राहिला नाहीं हें सांगण्यांत, आमच्या मतानें, अत्युक्ति झाली असें कोणीही म्हणेल असें वाटत नाहीं. सर्व सुशिक्षितांमध्यें तर हें खेदजनक दुःख पसरलेंच; परंतु आपल्या शहराबाहेर काय चाललें आहे याची तादृश पर्वा न करणाऱ्या सामान्य लोकांमध्यें देखील ज्यांस म्हणून बाबूसाहेबांचें नांव त्याच्या गुणानीं माहीत होतें, त्या प्रत्येक व्यक्तीकडून आणि समाजाकडून दुःखखेददर्शनार्थ कांहीं तरी चळवळ झाली व त्याबद्दल त्याजकडून कांहीं तरी विशेष हालचाल घडली एवढें येथें सांगितलें म्हणजे, बाबूसाहेबांचेसंबंधाचा लोकांत किती मान व आदर असून लोक त्यांस कोणत्या महापुरुषांत गणीत होते याची साधारण कल्पना वाचकांस झाल्यावांचून राहणार नाहीं.

" हे सुप्रसिद्ध बंगाली गृहस्थ तुरुंगांत गेल्याची वार्ता मात्र ह्या देशांतील लोकांचे कानावर गेली; तो त्या कारागृहवासी पुरुषावर चोहोंकडून दुःखप्रदर्शक पत्रें आणि तारा याचा जणूं काय वर्षाव झाला; आणि त्या पत्रांतून व तारांतून आपल्याला पैशाची कांहीं मदत पाहिजे असल्यास ती करण्याची आपली खुषी दर्शविली होती. ह्याप्रमाणें पुरुषमंडळीच बाबू सुरेंद्रनाथ याचेविषयीं कळकळ व हळहळ वाहणारी होती असें नाहीं; स्त्रीमंडळही बाबू सुरेंद्रनाथ यांच्या प्रियपत्नीवरील आपलें प्रेम व्यक्त करण्यास ह्या वेळीं पुढें झालें. बाबूसाहेबांच्या कारागृहवासानें त्यांचे पत्नीवर जो दुःखप्रसंग आला त्याबद्दलची हळहळ कलकत्याच्या व एकंदर बंगाल इलाख्यांतल्या स्त्रीमंडळानें उत्तम रीतीनें दर्शविली, व ती अपूर्व होती.

" बाबूसाहेबांचे कैदेच्या पहिल्या पंधरा दिवसांत तर तुरुंगामध्यें त्यांजकडे भेटीस जाणाऱ्या सर्व प्रकारच्या लोकांची अगदीं गर्दी उडाली होती. सर्व धंद्यांचे, उद्योगव्यवसायाचे, दर्जाचे व योग्यतेचे लहानमोठे व गरीबश्रीमंत लोक बाबूसाहेबांकडे त्यांचें सांत्वन करण्यास गेले होते. अशा प्रकारचा व योग्यतेचा समाज ह्यापूर्वीं त्या कारागृहाकडे कधीं तरी गेला असेल असें वाटत नाहीं. लहानमोठे, गरीबश्रीमंत, हलके व थोर अशा सर्व जातिधर्मांच्या, योग्यतेच्या आणि दर्जाच्या लोकांचें बाबूसाहेबांविषयीं एक मन व एक अंतःकरण झालें होतें; व त्या सर्वांचें त्याचेविषयीं अकपट प्रेम व निर्व्याजवात्सल्य होतें हें उघड दिसत होतें."

इंडियन एम्पायरमधील त्या वेळच्या सदरील लेखावरून बाबूसाहेबांविषयीं ह्या देशांतील एकंदर लोकांमध्यें किती चळवळ होऊन राहिली होती व त्या सर्वांस त्या प्रसंगाबद्दल किती हळहळ वाटत होती ह्याचा अजमास होईल. बाबूसाहेब हे त्या वेळीं ह्या सर्व देशाचें एक पूज्य व आराध्य दैवतच होऊन राहिलें होतें, असें म्हटलें तरी चालेल. त्यांना कैदेची शिक्षा झाल्याचें वृत्त सर्व लोकांना इतकें खेद व दुःखजनक झालें कीं, मोठमोठे सरकारी अधिकारीही त्याबद्दल हळहळ दाखवूं लागले व कलकत्यांतील कित्येक अधिकाऱ्यांना त्या दिवशीं त्या दुःखावेशांत आपल्या कचेऱ्यांतलीं कामेंही न करवल्यामुळें तद्दुःखदर्शनार्थ त्यांणीं आपलीं आफिसें बंद ठेविलीं. हा सर्व दुःखप्रदर्शनाचा व हळहळ दाखविण्याचा जो सर्वसाधारण प्रकार सर्व देशभर पाहण्यांत आला तो केवळ, सभेंत निघालेल्या एकाद्या प्रश्नावर ज्याप्रमाणें एक ठराव

होतो व तो सर्व लोक रीतीप्रमाणें मान्य करतात तशांतला नसून, बाबू सुरेंद्रनाथ यांचेविषयीं सर्व लोकांचे अंतःकरणांत जी प्रेमबुद्धि व जो आदर वागत होता त्याचा परिणाम होता, हें उघड आहे. बाबूसाहेबांकडे ह्या देशाच्या अगदीं एकीकडच्या भागांतूनसुद्धां तारा आणि पत्रें यांचा एकसारखा पूर वहात होता; व त्या सर्वांचा हेतु त्यांनमर आलेल्या प्रसंगाबद्दल त्यांचें सांत्वन करण्याचा होता, हें निराळें सांगावयाला नकोच. बाबूसाहेबांकडे येणारीं हीं पत्रें व तारा नेऊन पोंचविण्यासाठीं तुरुंगावरच्या अधिकाऱ्यांना एक स्वतंत्र पट्टेवालाच ठेवावा लागला होता. पत्रांच्या प्रत्येक बटवड्याच्या वेळीं बाबूसाहेबांच्या नांवाचीं एकेक पोतें किंवा थैली भरून पत्रें असत! ह्यावरून ह्या प्रसंगाच्या महत्वाची कल्पना होण्यासारखी आहे.

त्या वेळीं लार्ड रिपन हे व्हाइसराय आणि गव्हरनर जनरल होते. त्याजकडेही प्रतिदिवशीं व प्रत्येक आठवड्यांत ह्या देशांतील निरनिराळ्या भागांतल्या सार्वजनिक संस्था, मंडळ्या व सभा यांजकडून आणि खासगी व व्यक्तिशः ह्याप्रमाणें तारांचा अखंड ओघ चालला होता; व त्या सर्वांचा हाच उद्देश होता कीं, झालेल्या ह्या विलक्षण प्रकरणांत लाट साहेबांनीं आपला विशेष अधिकार चालवून त्या सर्वलोकप्रिय पुरुषावर दया करावी. आणि सर्वांची अशी खात्री होती कीं, 'अमाना' चे खटल्यांत ह्याप्रमाणें व्हाइसराय साहेबांना जर आपला विशेष अधिकार चालविण्याची कांहीं तरी सवड असती तर तो अधिकार त्यांनीं ह्या वेळीं खचित उपयोगांत आणिला असता; परंतु अशा प्रकारचा विशेष अधिकार चालविण्याची त्यांस नियमाप्रमाणें मुळींच सवड नसल्यामुळें, त्यांना ह्या लोकविनंतीस मान देतां आला नाहीं. खुद्द लार्ड रिपन यांस बाबूसाहेबांविषयीं सर्व राष्ट्राची येवढी प्रीति व निष्ठा पाहून विलक्षण कौतुक वाटलें; व त्यांनाही अशा लोकप्रिय पुरुषावर हा प्रसंग आल्याबद्दल खेद वाटला. त्याचा व खुद्द स्टेट सेक्रेटरी याचा ह्या कामांत तारांनीं कांहीं व्यवहार झाला, व लार्ड साहेबांकडून विलायत सरकाराकडे बाबू सुरेंद्रनाथ यांचेबद्दल विशेष शिफारसही करण्यांत आली होती, असें समजतें. परंतु त्या शिफारशीचा कांहींएक उपयोग झाला नाहीं, हें उघडच आहे. कारण, त्या शिफारशीचा कांहीं उपयोग झाला असता तर बाबूसाहेबांस मिळालेली शिक्षा कमी व्हावयास तरी पाहिजे होती. पण तसें कांहीं झालें नाहीं.

बाबू सुरेंद्रनाथ यांनीं आपल्याला कैदेची शिक्षा झाल्यावर लागलींच कलकत्ता येथील आपल्या ऑनररी मॅजिस्ट्रेटच्या हुद्द्याचा राजीनामा बंगाल सरकाराकडे पाठविला. परंतु तो राजीनामा त्या सरकारानें स्वीकारला नाहीं; इतकेंच नव्हे; तर सर हेन्री ह्यारिसन यांनीं ह्या राजीनाम्याचे विरुद्ध, म्हणजे, सरकारानें तो स्वीकारूं नये ह्यासाठीं, फार जोरानें लिहून, सुरेंद्रनाथ बाबूंच्या उपयुक्ततेविषयीं व त्यांजकडून हें न्यायाचें नाजूक काम न काढण्याविषयीं मोठी दांडगी शिफारस केली. अर्थात् त्या शिफारशीप्रमाणेंच झालें; व बाबूसाहेबांचा राजीनामा सरकारानें कबूल केला नाहीं.

येथें, बाबू सुरेंद्रनाथ यांनीं हा० को० पुढें आपल्याकडून झालेल्या प्रमादाबद्दल जी माफी मागितली तिचेविषयीं थोडा खुलासा केला पाहिजे. ता. ४ मे रोजीं बाबू सुरेंद्रनाथ हे आपले अटर्नी बाबू गणेशचंद्र चंद्र यांचे बरोबर बाबू उमेशचंद्र बानर्जी, ब्यारिस्टर,

यांचेकडे गेले. बाबू उमेशचंद्र हे त्या वेळीं कलकत्याचे जवळ असलेल्या आपल्या एका गांवीं रहात होते. तेथून ते गर्दीनें निघून हायकोर्टांत गेले व तेथें बाबू सुरेंद्रनाथ यांचा प्रतिज्ञालेख व माफीपत्र लिहून घेऊन तीं जज्जांना सुनावण्यांत आलीं. मागें, मि० वुइल्यम टेलर आणि इंग्लिशमन पत्राचे एडिटर क्याप्टन फर्नांडिक् यांचेवर, कलकत्ता हा० को० चे जज नामदार मि० जस्टिस द्वारकानाथ मित्र यांचेसंबंधानें अपमान होण्यासारखा लेख प्रसिद्ध केल्याबद्दल, त्या वेळचे हा० को० चे चीफ जस्टिस सर बार्न्स पीकाक् यांनीं समन्स काढून त्यांस जबाब देण्यास बोलाविलें होतें; व त्या समन्सांतच त्यांस लिहून कळविलें होतें कीं, झालेल्या प्रमादाबद्दल तुम्हीं माफी मागितली पाहिजे. व त्याप्रमाणें ते दोघे गृहस्थ हायकोर्टांत हजर होऊन त्यांणीं आपल्याकडून घडलेल्या प्रमादाबद्दल कोर्टाची माफी मागितली आणि ती माफी हायकोर्टानें स्वीकारून त्यांस सोडून दिलें. असाच भाग ह्या वेळींही व्हावयाचा. बाबू सुरेंद्रनाथ यांणीं आपल्या ब्यारिस्टराच्या सल्ल्यावरून, मागील उदाहरणें लक्ष्यांत आणून, रीतीप्रमाणें जी माफी मागावयाची ती सादर केली. परंतु ती माफी हायकोर्टानें कबूल केली नाहीं; व जी माफी मागितली होती ती मागावी तशी मागितली नाहीं, हें कारण दाखवून, ती नाकबूल करण्यांत आली. बाबू सुरेंद्रनाथ यांणीं किती गर्दीनें व जलदीनें आपल्या ब्यारिस्टरांसह हायकोर्टांत जाऊन प्रतिज्ञालेख व माफीपत्रक सादर केलें हें लक्ष्यांत वागवून, हा० को० नें त्या माफीपत्रांत दुरुस्ती करण्यास सुरेंद्रनाथ यांस सवड देऊन दिशा दाखविली असती तर त्याप्रमाणें माफीपत्र सादर करण्यास बाबूसाहेब नाखुष होते असेंही नाहीं. परंतु तशा प्रकारची सवड देण्यांत आली नाहीं व कोणत्या तऱ्हेनें माफी सादर करावी हेंही कळविण्यांत आलें नाहीं. हें कांहीं असो. बाबू सुरेंद्रनाथ यांस शिक्षा झाल्यावर ते तुरुंगांत असतां दुसरें माफीपत्र हा. को. ला सादर करण्याविषयीं बाबूसाहेबांकडे बहुत वजनदार लोकांकडून कळविण्यांत आलें. परंतु तसें करण्याचें त्यांणीं आतां अगदींच नाकारलें.

त्यांना दोन महिन्यांची शिक्षा झाली होती; व त्याप्रमाणें त्यांस ती मुदत संपल्यावर ता० ४ जुलई रोजीं तुरुंगातून सोडिलें. पण त्यांना जें तुरुंगातून सोडिलें त्याची तऱ्हा मात्र अगदींच नवीन होती. तुरुंगावरच्या अंमलदारांस हें कळलें होतें कीं, सुरेंद्रनाथ यांच्या बंदमुक्तीचे वेळीं अतिशय लोक जमून ते मोठ्या सत्कारानें त्यांचें स्वागत करणार आहेत; व त्या सत्कार-स्वागतसंबंधानें कलकत्ता शहरांत मोठी चळवळ होऊन राहिली होती. तेव्हां त्या सर्व समारंभाला व थाटाला मुद्दाम टाळण्यासाठीं, पूर्वीं कधींही घडली नाहीं अशी एक नवीनच योजना तुरुंगावरच्या अधिकाऱ्यांनीं अमलांत आणिली. त्या दिवशीं पहाटे ४ वाजतां तुरुंगावरच्या अंमलदारानें बाबू सुरेंद्रनाथ यांजकडे जाऊन त्यांस जागें केलें; आणि एक भाड्याची गाडी मागवून व तिच्यांत त्यांना बसवून, ज्या रस्त्यावर बाबूसाहेबांस सामोरे येणारे लोक फारसे जमावयाचे व भेटावयाचे नाहींत असें त्यास माहीत होतें त्या "लोअर सर्कल रोड" नांवाच्या रस्त्यानें ती गाडी हांकून नेऊन, त्यांस त्यांचे घरीं पोंचतें केलें. ह्याप्रमाणें बाबू साहेबांना स्वागतसमारंभ करण्याची जी लोकांची उमेद व इच्छा होती ती तुरुंगावरील

अधिकाऱ्यांचे मनस्वीपणामुळें ठिकाणच्या-ठिकाणीं राहून, त्यांची मोठी निराशा झाली हें सांगायला नकोच.

बरें, ही कलकत्त्याची गोष्ट झाली. परंतु बराकपूर येथें, म्हणजे सुरेंद्रनाथ बाबूंचें गाव जें मणिरामपूर त्याला जाण्यासाठीं उतरण्याचें रेल्वेस्टेशन, त्या शहरांत, सुरेंद्रनाथ बाबू तुरुंगांतून सुटल्यावर मणिरामपुरास जाण्यासाठीं जावयाचे होते: व तेथें त्यांचा फार उत्तमरीतीनें सत्कार करण्याचें ठरलें होतें; परंतु तो सर्व बेत तेथील अधिकाऱ्यांनीं ज्या रीतीनें व्यर्थ दवडून मोडून काढला ती रीति तर विलक्षणच होती. तारीख ३ जुलई रोजीं, म्हणजे सुरेंद्रनाथ बंदमुक्त होण्याचे पूर्वदिवशीं, २४ परगण्यांचे माजिस्ट्रेट मि० स्टीव्हन्स हे मुद्दाम तुरुंगांत जाऊन बाबू सुरेंद्रनाथ यांस भेटले; व त्यांजकडून त्यांनीं, त्यांची तुरुंगांतून सुटका झाल्यावर त्यांचा बराकपूर येथें सत्कार वगैरे होणार असल्याची जी बातमी होती ती खरी किंवा खोटी? याजबद्दल बातमी मिळविली. बाबूसाहेबांनाही त्याबद्दल खोटें बोलण्याचें काहीं एक कारण नसल्यामुळें, असें कांहीं होणार असल्याचें मी ऐकतों, असें त्यांनीं त्यांस कळविलें. तेवढ्या आधारावरून त्या भागाचे कमिशनर मि० मन्रो यांचे हुकुमावरून मि० स्टीव्हन्स यानीं बराकपूर येथें असें फर्माविण्याचें योजिलें कीं, क्याटोन्मेंटच्या हद्दींत कोणीही आपले घरीं बाबू सुरेंद्रनाथ यांचे सत्कारसंबंधाचा विचार करण्यासाठीं जमूं नये; व आपण अशी योजना करणार असल्याचें त्यांनीं स्वत: बाबूसाहेबासही कळविलें. त्यावरून बाबूसाहेबांनीं त्यास सांगितलें कीं, तुम्हाला असें कायदेशीर रीतीनें बिलकूल करितां येणार नाहीं. कारण, प्रत्येक मनुष्याचें घर म्हणजे तो त्याचा स्वसंरक्षणाचा स्वत:चा किल्ला असून, त्या किल्ल्यांत त्याला जें काहीं करणें असेल तें करण्यास तो मुखत्यार आहे. आणि ह्यासाठीं, खाजगी रीतीनें होणाऱ्या विशेष गोष्टींमध्यें सरकारी अधिकाऱ्यांनीं लुडबुड करून लोकाची अप्रीति संपादन करूं नये हें चांगलें. बाबू सुरेंद्रनाथ यांनीं जरी मि० स्टीव्हन्स या अधिकाऱ्याला असें बजावून सांगितलें तथापि, त्यांनीं, बराकपूर येथें ज्या घरीं बाबू सुरेंद्रनाथ यांचें स्वागत करण्यासाठीं मंडळी जमली होती त्या घराचेभोंवतीं पोलिसाची चौकी नेऊन उभी केली. व येणेंकरून असें झालें कीं, त्या सन्मानाचे कार्यास जणूं काय पोलिसाकडून ही सलामी देण्यासाठीं ही चौकी येऊन उभी राहिल्यासारखीच इतर लोकांस वाटूं लागली! त्या दिवशीं तिसरे प्रहरीं जाणाऱ्या गाडींतून बाबू सुरेंद्रनाथ हे बराकपुरास जाऊन दाखल झाले. त्या वेळीं सदर माजिस्ट्रेटही स्टेशनच्या प्लाटफार्मवर हजर असून त्यांचेबरोबर हत्यारबंद पोलिसचे लोक, स्टेशनावर कोणी हुकुमाशिवाय आल्यास त्यांस कैद करण्यासाठीं, हातीं हातबेड्या घेऊन तयार होते; व त्याचप्रमाणें त्या दिवशीं बराकपूर येथील सरकारी पलटणीस अगदीं तयार व सज्ज असण्याविषयीं हुकूम देऊन ठेविला होता! ज्या रस्त्यानें सुरेंद्रनाथ बाबू जावयाचे होते त्या रस्त्यांतली रहदारी अगदीं बंद केली होती; व ज्या स्नेह्याचे घरीं त्यांच्या आदरसत्कारार्थ मंडळी जमली होती त्या मंडळीचें काम आटोपून बाबूसाहेब आपले घरीं जाण्यास निघाले तेव्हा त्यांचे पाठोपाठ एक असिस्टंट पोलिस सुपरिंटेंडेंट गाडींत बसून त्यांचे घरापर्यंत, ते लोकशांति व लोकस्वास्थ्य न बिघडूं देतां निरुपद्रवीपणानें घरीं पोंचले

हें पाहण्यासाठीं, त्यांचेबरोबर मुद्दाम गेला! हा सर्व प्रकार फार फाजीलपणाचा आणि गरजेपेक्षां ज्यास्त काळजीचा झाला, हें कोणीही सांगेल. डिस्ट्रिक्ट माजिस्ट्रेटानें अशा प्रसंगीं मुद्दाम हजर राहून बंदोबस्त करणें व त्याच्या मदतीस असिस्टंट पोलिस सुपरिंटेंडेंट आपल्या काळ्या डगल्याच्या यमदूतांसह हत्यारबंद व हातबेड्या घेऊन सिद्ध असणें, ह्या सर्व फाजीलपणानें त्या लहानशा बराकपूर गांवांत लोकांमध्यें मोठी हालचाल उत्पन्न केली; व बाबू सुरेंद्रनाथ यांचा स्वागतसमारंभ बराकपूर शहरावर कोणता नवीन अनर्थ आणितो कोण जाणें, असें त्या समारंभाचें स्वरूप भासविलें!

हा सर्व फाजीलपणाचा बंदोबस्त व कडेकोटपणा अधिकाऱ्यांकडून झाला नसता तर सुरेंद्रनाथ बाबूंच्या स्वागतसमारंभाबद्दल बराकपूरच्या लोकांस कांहीं एक विलक्षणपणा व कौतुक वाटलें नसतें. परंतु त्या अधिकाऱ्यांच्या अवास्तव खबरदारीमुळें असें झालें कीं, सुरेंद्रनाथ बाबूंना कैद झाल्याबद्दलचें वृत्त बराकपूर येथील अगदीं पडद्यांत राहणाऱ्या स्त्रियांस किंवा शाळांतून जाणाऱ्या अथवा घरीं खेळणाऱ्या मुलांस व इतर अशाच अज्ञान लोकांस समजण्याचें जें कांहीं एक कारण नव्हतें तें कारण उत्पन्न केल्यासारखें झालें. म्हणजे, वर कळविलेल्या प्रकारच्या फाजील बंदोबस्तानें व कडेकोट व्यवस्थेनें तें वृत्त बराकपूर येथील प्रत्येक घरच्या अगदीं तळघरापर्यंत पोंचून, प्रत्येक व्यक्तीस सुरेंद्रनाथ बाबूंना पाहण्याची साहजिकच उत्कंठा उत्पन्न होऊन, ज्या रस्त्यानें बाबूसाहेबांची स्वारी गेली त्या रस्त्यावरील सर्व घरें प्रेक्षकांनीं फुलून गेलीं होतीं, व प्रत्येक घराच्या पडदे सोडलेल्या खिडक्या, गवाक्षें, धाबीं, गच्च्या, माड्या व सौधशिखरें स्त्रीबालपुरुषांनीं अगदीं खेंचून भरलीं होतीं. ह्या समारंभाला हा सर्व रंग अधिकाऱ्यांच्या गैरवाजवी व फाजील बंदोबस्तानें व कडकपणानेंच आला होता हें उघड आहे. म्हणजे, अधिकाऱ्यांनीं जरी ह्या समारंभास भलत्याच प्रकारचें रूप देण्याचा यत्न करून हा समारंभ अगदीं कमी योग्यतेचा समजला जावा अशाबद्दलचा यत्न केला, तरी त्या यत्नाचा परिणाम अधिकाऱ्यांचे इच्छेच्या अगदीं उलट, अर्थात्, बाबूसाहेबांच्या मित्रमंडळाला अनुकूल असा होऊन, बाबूसाहेबांचें नांव प्रत्येक घरीं अगदीं स्वयंपाकघरापर्यंत पोंचलें गेलें. हें काम खाजगी यत्नानें कोणी करूं म्हटलें असतें तर खास झालें नसतें; व तें काम ज्यांचेकडून कोणी विनंति किंवा अर्ज केल्यानेंही कधीं झालें नसतें तें त्या सरकारच्या संशयी अधिकाऱ्यांकडून बिनखर्चानें व आपखुषीनें झालें! असें होण्यांत एकप्रकारें त्या अधिकाऱ्यांची बाबूसाहेबांविषयीं विरोधभक्तिच दिसून आली असें म्हटलें तरी चालेल. त्यांणीं त्या समारंभास अगदीं कमीपणा आणण्याचा मनःपूर्वक वाटेल तसा भयंकर यत्न केला; आणि त्याचा परिणाम अगदीं विरुद्धदिशेचा असा अनुभवास आला! असा विलक्षण शहाणपणाचा प्रकार कधीं कधीं आमच्या इकडील अदूरदर्शी सरकारी कामगारांकडून दाखविण्यांत येतो.

बाबू सुरेंद्रनाथ यांच्या कैदेच्या शिक्षेमुळें एकंदर लोकमतावर फारच विलक्षण परिणाम झाला: ह्या देशांतील सर्व लोकांचें मतैक्य व्हावें, हा बाबू सुरेंद्रनाथ यांचा निरंतरचा अत्यंत चिंतनीय विषय होय. आणि तें मतैक्य होण्यास सुरुवात झाली आहे असें बाबूसाहेबांच्या कैदेच्या शिक्षेपासूनच

इकडील लोकांस कळून येऊं लागलें. बाबूसाहेबांना झालेल्या शिक्षेची वार्ता सर्व देशाच्या चारही दिशांस पोंचल्यावर तद्दुःखदर्शनार्थ ठिकठिकाणीं ज्या सभा भरल्या व त्या सभांकडून सुरेंद्रनाथांकडे जीं तारा व पत्रें पाठविण्यांत आलीं त्यांवरूनच सर्व हिंदुस्थानवासीमध्यें ऐकमत्य होण्यास सुरवात झाली असें मानण्यास सबळ कारण झालें. हिंदुस्थानच्या वायव्य कोणास देराइस्माइलखान ( पंजाब ) येथपासून तों पूर्वेकडे ब्रम्हदेशाच्या सरहद्दीवरील चितेगांव ऊर्फ इस्लामाबाद ( बंगाल ) पर्यंत, आणि तसेंच, पुण्यापासून बेहरामपूर ( मद्रास ) पर्यंत, चारही दिशांकडील बहुतेक शहरांत बाबू सुरेंद्रनाथ यांस झालेल्या शिक्षेबद्दल दुःख व हळहळ प्रदर्शित करण्याकरितां मोठमोठ्या सभा भरून, वर लिहिल्याप्रमाणें, बाबूसाहेबांकडे तारा व पत्रें पाठविण्यांत आलीं. हें ह्या देशांतील सर्व लोकांच्या मतैक्याचें दर्शक असें उत्कृष्ट उदाहरण नाहीं असें कोणीही म्हणणार नाहीं.

बाबू सुरेंद्रनाथ यांच्यावरील ह्या प्रसंगानें देशांतील ऐक्यास एकप्रकारें नवीनच स्वरूप आल्यासारखें झालें म्हटलें तरी चालेल. बंगाल्यांत वर्तमानपत्रें वाचणारी संख्या ह्या प्रसंगापासून फार वाढली. **बंगवासी** नामक पत्राचा विस्तार ह्याच वेळीं अतिशय वाढून, **संजीवनी** आणि **समय** हीं दोन बंगाली लोकप्रिय पत्रें याच समयास निघालीं; व त्या सर्व पत्रांतून बाबू सुरेंद्रनाथ यांचेसंबंधानें ज्या अनेक हकीकती प्रसिद्ध होत त्या हकीकती वाचण्यास वाचकांची अतिशय उत्सुकता दृष्टीस पडूं लागली. खुद्द कलकत्यास बाबू साहेबांवरील दुष्प्रसंगसंबंधानें दुःख व हळहळ दाखविण्याकरितां म्हणून ज्या ठिकठिकाणीं सभा भरल्या त्या सभांस जो लोकसमाज जमत असे तसा समाज जमल्याचीं उदाहरणें पूर्वी कधींही कोणाचें पाहण्यांत आल्याचें कोणास आठवत नाहीं. सर्वांत टाउनहालामध्यें जी थोरली टोलेजंग सभा भरली होती त्या सभेला तर इतके लोक जमले होते कीं, त्यांना तेथें उभें राहण्यास जागा पुरेनाशी झाली. त्या दिवशीं एकाच वेळीं व निरनिराळ्या ठिकाणीं तीन सभा भरविण्यांत आल्या होत्या व त्या तीनही सभांकडे निरनिराळा समाज वांटला गेला होता. त्या दिवशीं एकंदर २०,००० वर लोकसमाज टाउनहालांतल्या ह्या निरनिराळ्या सभांकडे फांकला होता. येवढा मोठा आणि टोलेजंग समाज एकाच कार्यासाठीं एकसमयावच्छेदेंकरून एके स्थलीं मिळाल्याचें हें उदाहरण अपूर्व होतें, असें त्या वेळच्या कलकत्याच्या पत्रकारांनीं लिहिलें आहे. वरील सभेच्या दिवशीं, कलकत्याच्या मुख्य व्यापारी पेंठा म्हणून ज्या प्रसिद्ध आहेत ते बडाबजार व चिनीबाजार हे दोनही व्यापारी लोकांचे प्रमुख नगरभाग अगदीं ओसाड पडून, म्हणजे सर्व व्यापाऱ्यांनीं आपापलीं दुकानें बंद करून, वरील सभेंत हजर राहण्यानें बाबूसाहेबांचे संबंधाचा आपला प्रेमभाव व्यक्त केला. ह्याचप्रमाणें, मोठमोठे पेढीवाले आणि लक्षावधि रुपयांची दररोज देवघेव करणारे उदमी व सावकार ह्या दिवशीं आपलें सर्व काम मुद्दाम एकीकडे ठेवून एका मान्यवर पुरुषाविषयींचें जें आपलें कर्तव्य व त्या विषयींचें वात्सल्य तें स्पष्टपणें दाखविण्यासाठीं एकदिलानें त्या सभेस जमले होते. आणि म्हणूनच कलकत्यास हा अदृष्टपूर्व देखावा होता असें त्या वेळच्या वर्तमानपत्रांत म्हटलें आहे.

## एक विशेष गोष्ट-कृष्णगड येथें भरलेली सभा.

ता० ४ मे सन १८८३ शनिवार रोजी बाबू सुरेंद्रनाथ यांस शिक्षा देऊन कैदेंत पाठविलें व ती खेदकारक बातमी दा- लासारखी अखिल भारतवर्षांत पसर- दुसरे दिवशीं म्हणजे रविवारीं प्रातःका- कृष्णगड येथील सबजज्ज बाबू अमृतला- छत्री यांचे घरीं त्यांची मित्रमंडळी व- मानपत्रें वाचण्यास नित्याप्रमाणें बसली अस- एका विद्यार्थ्यानें एक खाजगी पत्र आणू- सदर मंडळीस दाखविलें. त्या पत्रांत बाबूसाहेबांच्या कैदेची हृदयद्रावक दुर्वा- लिहिलेली होती. ती वार्ता वाचून तेथें - सलेल्या सर्व मंडळीस अत्यंत दुःख झालें. त्या मंडळींत बाबू रामगोपाळ सन्याल एक बाबूसाहेबांचे स्नेही होते. बाबू स- न्याल ह्यांनीं अनेक प्रसंगीं बाबू सुरेंद्रनाथ यांचे हाताखालीं कामें केलीं असून त्यांच्या- विषयीं त्यांची अत्यंत प्रेमबुद्धि होती. त्यांन- तर ही बातमी ऐकून आपल्यावर वज्राघात झाल्यासारखें दुःख झालें! आतां काय करावें हें त्यांस कांहीं सुचेना. त्यांनीं तावडतोब कृष्णगडचे पुढारी गृहस्थ आणि जमीनदार प्रसिद्ध कै० रायबहादूर बाबू यदुनाथ राय आणि तेथीलच प्रसिद्ध वकील बाबू प्रसन्नकुमार बोस, एम्. ए., बी. एल्, व इतर कृष्णगडचे प्रसिद्ध व सभेचे पुढारी गृहस्थ यांच्या भेटी घेऊन त्यांस तें वर्तमान कळविलें, तेव्हां त्यांनाही तें वर्तमान ऐकून अशनिपात झाल्यासारखेंच झालें. प्रत्येक पुढारी व देशहितेच्छूला आपलें अर्धांग गेलें किंवा लटकें पडलें असें वाटलें! नंतर बाबू रामगोपाळ सन्याल यांनीं बाबू यदुनाथ आणि प्रसन्नकुमार यांस कळविलें कीं, आजच्या आज येथें बाबू सुरेंद्रनाथ यांजवर आलेल्या प्रसंगाबद्दलचें दुःख व हळहळ दर्शविण्यासाठीं सर्व लोकांची सभा भरविली पाहिजे. बाबू यदुनाथ राय बहादूर व बाबू प्रसन्नकुमार बोस यांनीं बाबू रामगोपाळ सन्याल यांच्या इच्छेप्रमाणें करण्याचें तावडतोब मनांत आणिलें; व त्या तिघांनीं आपल्या मदतीला आणखी कांहीं मित्रांस बरोबर घेऊन कृष्णगड नगरच्या चाऱ्ही दिशा वाटून घेतल्या. आणि त्या शहरच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत प्रत्येक सुशिक्षित गृहस्थाचे घरीं जाऊन, त्यास सायंकाळीं सहा वाजतां सर्वांनीं सभेला येऊन तेथें दुःखप्रदर्शनाचा ठराव करण्याचें बोलावणें केलें. त्या बोलावण्याप्रमाणें सायंकाळीं सहा वाजण्याचे पूर्वीच कृष्णगडचे सर्व सुशिक्षित लोक तेथील लायब्ररीच्या दिवाणखान्यांत मोठ्या आतुरतेनें जमले. हा समाज सुमारें हजार बाराशें लोकांचा असावा. त्यांत कृष्णगड येथील सर्व जमीनदार, वकील, डाक्टर, व्यापारी, शाळाधिकारी, स्कूलमास्तर आणि इतर सुखवस्तु व श्रीमान् असे बहुतेक लोक हजर होते. त्या प्रसंगीं रायबहादूर यदुनाथ राय यांस अध्यक्षस्थान दिलें असून, त्यांनीं त्या प्रसंगाला उचित व बाबू सुरेंद्रनाथ यांच्यावरील वरील प्रसंगाबद्दलची हळहळ जेणेंकरून व्यक्त होईल असें फार हृदयद्रावक भाषण करून, एकंदर नडिदया जिल्ह्यांतील लोकांना बाबू साहेबांवर गुजरलेल्या दुष्प्रसंगाबद्दल फार दुःख होऊन वाईट वाटत आहे असें कळविलें; व तशा आशयाचा त्यांणीं तेथें सर्वानुमतें ठराव केला. आणि त्याच रात्रीं त्या हकीकतीची तार बाबू सुरेंद्रनाथ यांस कलकत्याच्या तुरुंगांत पाठविण्याचें ठरवून, त्यांच्या बंगाली वर्तमानपत्राच्या १६ प्रती कृष्णगडच्या लोकांनीं घ्यावयाच्या तेथें वर्गणी जमवून घेण्याचेंही ठर-

विलें, म्हणजे, येणेंकरून बाबू सुरेंद्रनाथ यांची देशसेवा आपल्याला अत्यंत मान्य व अभिनंदनीय आहे असें तेथें जमलेल्या लोकांनीं व्यक्त केलें. बाबू सुरेंद्रनाथ यांस तुरुंगाची शिक्षा झाल्याबरोबर तद्दुःखदर्शनार्थ जमलेल्या सर्व सभांमध्यें वर सांगितलेली कृष्णगडची सभा ही पहिली सभा होय; आणि ही सभा झाल्यानंतर तिचें अनुकरण कलकत्ता वगैरे इतर ठिकाणच्या अनेक शहरांमध्यें होऊन, ह्या देशांत सर्वत्र सभा झाल्याबद्दलचें सविस्तर वर्णन पूर्वीं दिलेंच आहे. तेव्हां आतां हा भाग येथें पुरा करून बाबू सुरेंद्रनाथ यांच्या आयुश्चरित्रांतील आणखी कित्येक महत्वाच्या गोष्टींचें थोडक्यांत वर्णन देऊन हा चरित्रलेख आटोपता घेतला पाहिजे.

**इंडियन असोसिएशनची मूळ स्थापना.**

ह्या देशांत इंग्रजी विद्येचा जसजसा फैलाव होत चालला तसतशी एतद्देशियांमध्यें राजकीय सुधारणांच्या संबंधानें चळवळ करण्याची इच्छा साहजिकच उत्पन्न होऊन, मध्यम वर्गाच्या सुशिक्षित लोकांनीं अशा चळवळीकरितां व ह्या देशांत राजकीय प्रश्नांचा विचार करण्यासाठीं म्हणून कित्येक ठिकाणीं संस्था स्थापन करण्याची कल्पना काढली. आणि अशा संस्थांमध्यें ह्या देशांतील सर्व वर्गांच्या, जातींच्या व धंद्यांच्या लोकांचे मुखत्यार घेऊन, सर्वांच्या वतीनें काम करण्यासाठीं व्यवस्थित व कायदेशीर सभा स्थापन होण्याचा काळ आला आहे असें सुशिक्षित लोकांस वाटूं लागलें. अशा प्रकारची कलकत्यास ब्रिटिश इंडियन असोसिएशन नांवाची एक सभा स्थापन झाली होती. व त्या सभेकडून ह्या देशांतील लोकांच्या कल्याणाची अनेक प्रकारें खटपट झाली असून पुढेंही ती चालू होती. परंतु पुढें पुढें सर्वसाधारण लोकांना ती सभा बरीच अगम्य होऊन, सरासरीनें ती एकाच पक्षाची अथवा मताची झाल्यासारखी झाली. तेव्हां तिच्यापासून व्हावा तसा कांहीं उपयोग होण्याचें चिन्ह दिसेना. ह्यासाठीं तशा प्रकारची व सर्वसाधारण लोकांस सहज गम्य अशी राजकीय प्रश्नांचे विचार करून चळवळ करणारा, स्वतंत्र व सर्व पक्षाचे लोकांची एक सभा स्थापन करण्याचा कलकत्त्यांतले सुशिक्षित लोकांचा निश्चय झाला. व ह्या कामास इंग्लंडाहून इकडे परत आलेल्या बंगाली विद्वान् गृहस्थांचेंही पूर्णपणें साहाय्य मिळालें.

अशी एक इंडियन असोशिएशन नांवाची सभा ता० २६ जुलई १८७६ रोजीं स्थापन करण्याचें ठरून त्याप्रमाणें प्रसिद्ध झालें. ह्या सभास्थापनाचा दिवस बाबू सुरेंद्रनाथ यांच्या आयुःक्रमांतील एक अत्यंत स्मरणीय असा समजला जातो. ह्या सभास्थापनाचे दिवशीं दुपारीं १२ वाजतां बाबूसाहेबांचा एकुलता एक प्रियपुत्र वारला! ही सभा स्थापन करण्यांत तर तेच काय ते मुख्य पुढाकार घेणारे व खटपट करणारे होते; तेव्हां त्यांचेवरच हा पुत्रशोकाचा प्रसंग आल्यावर सभा स्थापनाचा मूळ विचारच लटका पडण्याचा प्रसंग आला, हें उघड आहे. परंतु ठरल्याप्रमाणे ती सभा स्थापन होऊन तिची सुरुवात झालीच पाहिजे अशी बाबूसाहेबांचे मनांत बलवत्तर इच्छा असल्यामुळें ते, पुत्रशोक एकीकडे ठेवून, सभास्थानीं नियमित वेळीं, तिसरे प्रहरीं चार वाजतां, हजर झाले. त्यामुळें सर्व लोकांस त्यांच्या देशहितेच्छेच्या प्रबलतेचा मोठा विस्मय वाटला. आणि लोकांचा हा विस्मय तर पुढें अधिकच वाढला. सुरेंद्रनाथ त्या सभेला नुसते हजर झाले येवढेंच नाहीं; तर पुढें सभेचें

काम सुरू झाल्यावर एकानें प्रतिसूचना आणली कीं, असली सभा येथें स्थापण्याचें प्रयोजनच नाहीं. कारण, अशा प्रकारची रय तेच्या हक्कांचा विचार करणारी "इंडियन-लीग" नांवाची एक सभा येथें अस्तित्वांत असतां "इंडियन असोसिएशन" नांवाची आणखी एक सभा स्थापन करण्याची आवश्यकता नाहीं. ही प्रतिसूचना आलेली पाहून आपल्या हेतूप्रमाणें सभा स्थापन होण्यास हरकत येणार असें बाबू सुरेंद्रनाथ यांस वाटलें. आणि ते क्षणेक आपला पुत्रशोक बाजूला ठेवून त्यांणीं आपल्या अमोघ वक्तृत्वानें त्या प्रतिसूचना आणणारास असा झणझणीत जबाब दिला कीं, सर्व सभा यक्क होऊन जाऊन, सर्व सभेचें मत सुरेंद्रनाथ बाबूंच्या मताप्रमाणें झालें; व ती प्रतिसूचना रद्द झाली. अर्थात् त्यांच्या हेतूप्रमाणें सर्वानुमतें इंडियन असोसिएशन सभा स्थापन झाली. ह्या सभेच्या अध्यक्षस्थानीं "व्यवस्थादर्पण" पुस्तकाचे प्रसिद्ध कर्ते बाबू श्यामचरण सरकार हे असून, हिंदु पेट्रियटचे कर्ते लोकमान्य कै. बाबू कृष्णदास पाल, महाराजा नरेंद्र कृष्ण बहादूर आणि इतर थोर थोर व सुप्रसिद्ध गृहस्थ होते. ह्या नवीन स्थापन झालेल्या इंडियन असोसिएशनमध्यें कलकत्याचे प्रसिद्ध कायदेपंडित, वैद्यशास्त्रज्ञ, आणि असेच मोठमोठे शास्त्रवेत्ते, विद्वान्, श्रीयुत व घरंदाज लोक भराभर सभासद झाले; व त्यांणीं ह्या असल्या सभेबद्दल आपली मोठी मान्यता दाखवून तिच्या उत्पादकांचें, अर्थात् बाबू सुरेंद्रनाथ यांचें, मोठें अभिनंदन केलें.

ह्या सभेचे सभासद झालेल्यांमध्यें कलकत्याचे प्रसिद्ध ब्यारिस्टर मनमोहन घोस, दुसरे ब्यारिस्टर आनंदमोहन बोस, एम. ए. व केंब्रिज युनिव्हर्सिटीचे ऱ्यांगलर, कलकत्ता हायकोर्टांतील हुशार व प्रसिद्ध वकील बाबू महेशचंद्र चौधरी, प्रसिद्ध वक्ते बाबू कालीचरण बानर्जी, सुप्रसिद्ध बंगाली व संस्कृत पंडित बाबू अक्षयचंद्र सरकार आणि असेच सर्वमान्य, थोर व श्रीमान् गृहस्थ ह्या सभेचे सभासद झाले. त्या सर्वांची येथें नांवनिशी देणें विस्तारा[च] हो-ऊन तसें करणें अशक्यही आहे. ह्या स[भे]च्या सेक्रेटरीचे जागीं ब्यारिस्टर आनंदमोहन बोस यांस नेमिलें. यांचेपेक्षां हुशार, कार्यदक्ष आणि आस्थेवाईक गृहस्थ ह्या नवीन असोसिएशनच्या सेक्रेटरीचे जागीं नेमण्यास योग्य असा सांपडलाच नसता.

आमच्या देशांत कोणतीही संस्था प्रथमतः ज्या उत्साहानें, ईर्षेनें व अभिमानानें स्थापन करण्यांत येते तो उत्साह, ती ईर्षा आणि तो अभिमान फार दिवस न टिकतां पुढें त्या पुढारी लोकांत लवकरच निरुत्साह, निरभिमान, व औदासीन्य उत्पन्न होऊन हळू हळू त्यांच्या हालचालींत शैथिल्य व मांद्य येतें, असा अनुभव आपल्याला बहुतेक सर्वत्र येतो. त्याप्रमाणें बघितलें असतां ह्या कार्याचे उत्पादक जे बाबू सुरेंद्रनाथ त्यांच्यांमध्येंही त्याच सर्वसाधारण दुर्गुणांचा प्रादुर्भाव अनुभवास आला कीं काय ? तें पाहिलें तर, त्याचे उलट त्यांची सर्वांशीं स्थिति असल्याचें सर्वांना कळून आलें आहे. राजकीय चळवळीचा अग्निशकट संतत व सुयंत्र चालू ठेवण्यास तसाच असाधारण मेहनती, अश्रांत आणि कळकळीचा मनुष्य सारथ्य करणारा असला पाहिजे. आणि असे उत्कृष्ट सारथी वरील संस्थेच्या सुदैवानें बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी हे मिळाले आहेत. बाबू सुरेंद्रनाथ हे नुस्ते उत्कृष्ट

सारथीच आहेत असें नसून ते त्या अग्निशकटाचे प्रत्येक कामांतील मोठे वाकब व्यवस्थापक आहेत. आगगाडीच्या एंजिनावर सारथी ( ड्रायव्हर ), आगवाला, कोळसेवाला, रक्षक ( गार्ड ) वगैरे अधिकारी लागतात व तीं सर्व कामें निरनिराळ्या माणसांकडे सोंपवलेलीं असतात. आमच्या वर म्हटलेल्या राजकीय चळवळीच्या अग्निशकटाचें सारथ्य करणारे जसे बाबूसाहेब आहेत तसेच ते त्याजवरील अग्निसंदीपक किंवा अग्न्युत्पादक ( फायरमन ), अंगारपूरक ( कोल्‌मन–कोळसेवाले ) व रक्षक ( गार्ड ) ही आहेत. सारांश, त्या शकटाला जें चैतन्य ठेवाव याचें तें सर्व त्यांजकडेच आहे, किंवा तें त्यांनीं आपल्याकडेच घेतलें आहे. ह्या अग्निशकटाला असा चालक मिळणें दुष्प्राप्य आहे. जेव्हां जेव्हां एतद्देशीयांचे हक्कांचा प्रश्न निघतो तेव्हां तेव्हां हा पुरुष अत्यंत जागरूकतेनें त्या प्रश्नाच्या सर्व दिशांवर लक्ष्य ठेवून व त्याचे सर्व बाजूंचा विचार करून त्याबद्दल योग्य मार्गानें चळवळ करण्यास सदैव दक्ष व तत्पर असतो. या अग्निशकटाच्या प्रत्येक यांत्रिक चक्रावर त्यांची सूक्ष्म नजर राहून मोठ्या काळजीनें, हुशारीनें व सावधगिरीनें त्या यंत्राकडून ते काम करून घेत असतात. व त्या यांत्रिक प्रगमनाचा परिणाम सर्व देशाच्या अनुभवास उत्कृष्ट रीतीनें येत असतो. गेल्या वीस वर्षांत बंगाल आणि उत्तर हिंदुस्थान ह्या भागांतल्या अगदीं एकीकडच्या कोनाकोपऱ्यांतही जी राजकीय चळवळ चालू असलेली दिसते तिला मूळ कारण ही मूर्तिच आहे. सर्वत्र राजकीय चळवळींचें जें बीज पेरिलें गेलें आहे त्याचे प्रेरक बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी हेच असून, त्यावरून त्यांजवर प्रेम व भक्ति ठेवणारे त्यांस " **लोकनायक** " असें मोठ्या गौरवानें म्हणतात. आणि त्यांचा मत्सर किंवा द्वेष करणारे यांस उपहासानें " संक्षोभक " अथवा चळवळे किंवा हलकल्लोळ करणारे असें म्हणतात. आणि आम्ही म्हणतों, तीं दोन्ही विशेषणें त्याचे अंगच्या गुणाचा विशेषच दाखवितात. लोकनायकत्व किंवा संक्षोभकत्व हीं दोन्ही कामें कोणा तरी असामान्य मनुष्याकडे असणेंच शक्य आहे व तीं दोन्ही जर बाबू सुरेंद्रनाथ यांजकडे आहेत तर आम्ही म्हणतों कीं, त्यांच्या मित्रांत जशी त्यांचेबद्दलची प्रीति व आदर आहे तशीच त्यांच्या शत्रूंमध्येंही त्यांचेविषयीं भीति व धास्ती आहे.

आम्ही सुरेंद्रनाथ बाबूंच्या नुसत्या राजकीय चळवळीचे कामीं पुढाकार व पुरोगामित्व स्वीकारून तदनुसार वागण्याच्या गुणावरूनच त्यांची प्रशंसा करितों असें नसून, त्यांच्या चळवळ्या स्वभावामध्येंच, ज्या कोणत्याही कामाचे संबंधानें चळवळ करावयाची त्या कामाचें महत्व, योग्यता आणि त्याचा लोकांचे हिताहिताशीं असलेला संबंध यांचेबद्दल सारासारविचारानें व दूरदृष्टीनें मनन व चिंतन करून नंतर त्या कामास हात घालण्याचें जें धोरण ते वापरतात तें फारच तारीफ करण्यासारखें असतें; आणि ह्यामुळें त्यांणीं त्या कामाचें मनन व चिंतन करून त्याबद्दलचें विवेचन लेखनद्वारा सरकारापुढें ठेविलें म्हणजे सरकारालाही त्याजकडे सहसा दुर्लक्ष्य करितां येत नाहीं, असा अनुभव आहे. इंडियन असोसिएशनचे सेक्रेटरी म्हणून बाबूसाहेबांकडून आजपर्यंत अनेक विषयांवरील अर्ज लिहून सरकाराकडे पाठविण्यांत आले आहेत; व त्या सर्व अर्जांची चोहोंकडे मोठी वाहवाच होत आलेली पाहण्यांत येत आहे. कल-

करण्यास रयतेच्या तर्फेनें सरकाराकडे मुद्देसूद, कायदेशीर आणि खरे हक्क दाखविणारे अर्ज लिहून पाठविण्याचें मोठ्या जबाबदारीचें व कुशलतेचे काम बाबू कृष्णदास पाल यांचे पश्चात् बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी यांच्या वांचून करणारा अत्यंत निष्णात व तत्पर दुसरा कोणीही पुरुष नाहीं. ही गोष्ट कलकत्त्यास व इतरत्र, सर्वश्रुत आहे, म्हणून येथें त्याबद्दल अधिक लिहिण्याचें कारण नाहीं.

बाबू सुरेंद्रनाथ यांनीं स्थापन केलेल्या इंडियन असोसिएशननें पहिलें जें काम अंगावर घेतलें तें चढाओढीच्या सिव्हिलसर्व्हिस परीक्षेला ठेविलेल्या वयाची यत्ता वाढविण्याबद्दल चळवळ करण्याचें होतें. लार्ड सालिसबरी यांनीं आपल्या प्रधानकीमध्यें, ह्या परीक्षेला पहिल्यानें जी २१ वर्षांचे वयाची यत्ता होती ती यत्ता कमी करून १९ वर्षांची केली. ह्याबद्दल ह्या देशांत चोहोंकडे चळवळ झालीच पाहिजे असें बाबूसाहेबांचे मनांत आलें. कारण, त्या परीक्षेचें काठिन्य आणि त्या परीक्षेंत पास होण्याचें दिव्य हीं काय आहेत व त्याचें स्वरूप कसें असतें हें बाबूसाहेबांस स्वानुभवावरून पूर्ण माहीत झालें असल्यामुळे, त्या परीक्षेच्यासंबंधानें येणाऱ्या एकंदर विघ्नांचें दूरीकरण करण्याचा होईल तितका यत्न आपल्याकडील सर्व सार्वजनिक संस्थांकडून झाला पाहिजे, असा त्याचा आद्य हेतु होता. आणि त्या हेतुसिद्ध्यर्थ त्यांनीं आपल्या इंडियन असोसिएशनच्यातर्फे चळवळ करण्यास सुरुवात केली. लार्ड सालिसबरींनीं हा वयाचे कमी यत्तेचा ठराव प्रसिद्ध केल्याबरोबर त्याला रयतेची हरकत कळविण्यासाठीं सुरेंद्रनाथ यांनीं कलकत्त्यास इंडियन असोसिएशनच्या अधिकाराखालीं टा-

८

स...

चें लक्ष्य वळा...

संबंधानें एक फारच मोठी सभा भरविली व त्या विलायत सरकाराकडे पाठा सर्व लोकांझाला; आणि तोच अर्ज घेऊन प्रश्नाचे असोसिएशनच्या तर्फे त्याजबद्दल तो देशांत चळवळ करण्यासाठीं व त्या मह-त्वाचे प्रश्नाकडे स्वदेशबंधूंचें लक्ष्य वेधण्याकरितां सुरेंद्रनाथ हे स्वतः पर्यटन करण्यास निघाले. ह्या पर्यटनांत ते उत्तरहिंदुस्थानामध्यें सर्व मोठमोठ्या शहरीं गेले; व तेथें तेथें सभा भरवून त्यांनीं आपल्या देशबांधवांस त्या महत्वाचे प्रश्नाचा विचार करण्याची प्रेरणा केली आणि इंडियन असोसिएशनकडून विलायत सरकाराकडे जो अर्ज पाठविण्याचें ठरविलें होतें तोच अर्ज पसंत करण्याबद्दलची विनंति केली. ह्या प्रवासांतच ते मुंबई, मद्रास, पुणें, सुरत व अमदाबाद ह्या दक्षिण हिंदुस्थानांतील प्रसिद्ध शहरांत जाऊन, व तेथें तेथें सभा भरवून, तोच विषय सर्वांस श्रुत करून त्याबद्दलची लोकसंमति मिळविण्याची फार मेहनत घेतली. ह्या योगानें दोन गोष्टी सिद्ध झाल्या: सिव्हिल सर्व्हिस परीक्षेच्या वयाचे यत्तेच्या संबंधाचें महत्व व नाजूकपणा लोकांचे पूर्ण नजरेस आला, आणि बाबूसाहेबांच्या अंगची प्रशंसनीय विद्वत्ता, लोकोत्तर वक्तृता आणि अनन्यसाधारण श्रमसहिष्णुता ह्या सद्गुणांचा लोकांमध्यें मोठा प्रकाश पडून त्यांची थोर योग्यता सर्वांस कळून आली. चोहोंकडे त्यांनीं सुचविलेला अर्ज पसंत करण्यांत येऊन त्याजवर लाखों लोकांच्या मोठ्या खुषीनें व आस्थेनें सह्या झाल्या. सारांश, ह्या प्रश्नाचेसंबंधानें सर्व हिंदुस्थानांत जी व जशी चळवळ झाली ती व तशी चळवळ

ह्या प्रसंगापूर्वी कधींही व कोणाकडूनहि झाली नव्हती. तेव्हां त्याबद्दलचें सर्व यश आमच्या विषयनायकाकडेसच आहे हें वेगळें सांगावयाला नकोच.

ह्या देशांतील निरनिराळ्या भागांतलें मतवैचित्र्य, भाषाभिन्नत्व, सामाजिक एकरीतिराहित्य आणि नानाजातित्व हीं सर्व पृथ्वीवरील इतर देशांपेक्षां सर्वैक्य होण्यास जरी विशताविभूत आहेत तरी, राजकीय हक्कांचें महत्व आणि त्यांच्या प्रात्यर्थ मेहनत व चळवळ करण्याबद्दलचें एकत्व हीं लोकांना मान्य होणें कांहीं कठिण नसावें, हें जें तत्व सुरेंद्रनाथ बाबूंनीं ठिकठिकाणीं आपल्या व्याख्यानांत लोकाना कळविलें तें तत्व, सर्वत्र, लोकांना अत्यंत मान्य व कबूल झालें; व हें मतशिक्षण आधुनिक स्थितींतल्या हिंदुस्थानांत लोकांमध्यें अगदीं नवीनच प्रविष्ट झालें असें म्हणण्यास हरकत नाहीं. राष्ट्रीयसभा तरी काय करीत आहे? हेंच तत्व सर्व लोकांस उपदेशीत आहे. असो. वर सांगितलेल्या चळवळीचे प्रश्नसंबंधाचा लिहिलेला अर्ज विलायतसरकारापुढें सादर करण्यास बाबू लालमोहन घोस ब्यारिस्टर, हे इंडियन असोसिएशनचे मुखत्यार म्हणून मुद्दाम इंग्लंडास गेले. व तेथें त्यांणीं त्या विषयसंबंधानें बुइलीज् रूम नांवाच्या ठिकाणीं जोरदार, मुद्देशीर आणि इकडील रयतेच्या हक्करक्षणाबद्दलची कळकळ बाळगण्याविषयींच्या सूचनेचें जें भाषण केलें त्याचा परिणामच, पुढें स्टयाटयूटरी सिव्हिल सर्व्हिसची जी रीति ह्या देशांत सरकारानें चालू केली, ती होय.

बाबू सुरेंद्रनाथ यांणीं १८७९ आणि त्यापुढें १८८४ ह्या दोन सालीं पुनः ह्या देशांतलें ऐक्य वाढावें व लोकांनीं आपल्या राजकीय हक्करक्षणाविषयीं सावधगिरी राखावी, असें सांगण्याकरितां ह्या देशांत सर्वत्र प्रवास करून आपल्या पूर्वीच्या ओळखी ताज्या केल्या. ह्या कामांत बाबूसाहेबांचें धोरण फारच प्रशंसनीय व अनुकरणीय होतें. पुढें इंडियन असोसिएशननें स्थानिक स्वराज्यव्यवस्थेचा प्रश्न हातीं घेतला. म्हणजे, स्थानिक स्वराज्यदानाचें यश जें सर्व लोकप्रिय होऊन गेलेल्या लार्ड रिपन ह्या व्हाइसरायांनीं संपादन केलें त्या स्थानिक स्वराज्यग्रहणाचा आपला हक्क व आपली योग्यता आहे असें सरकारापुढें व लोकांपुढें ठेवण्याचें अपूर्व कार्य इंडियन असोसिएशनकडून बाबू सुरेंद्रनाथ यांच्या प्रेरणेवरूनच झालें हें ध्यानांत ठेविलें पाहिजे. ह्या कार्याबद्दल बाबूसाहेबांकडून अनेक ठिकाणीं व्याख्यानें वगैरे देण्यांत आलेलीं लार्ड रिपन साहेबांचे कानावर गेलीं व पुढें एका वेळीं लाटसाहेबानीं देहरादून येथें भाषण करितांना त्या हक्कासंबंधानें थोडासा उल्लेख करून, तो हक्क इकडील रयतेला देण्याविषयीं आपल्याला राजराजेश्वरी महाराणी साहेबांनीं आज्ञा केली आहे असें कळविलें. ह्याप्रमाणें लार्ड रिपन साहेबांकडून त्या आशापूर्तीचें आश्वासन मिळाल्यावर इंडियन असोसिएशनकडून सर्व म्युनिसिपालिटयांकडे सरकारच्याजवळ स्थानिकस्वराज्याचा हक्क मिळण्याबद्दलचे अर्ज करण्याविषयींच्या प्रेरणेचे लेख लिहून गेले, व त्याप्रमाणें ह्या देशांत चोहोंकडे उचल होऊन सरकारापुढें अनेक म्युनिसिपालिटयांकडून आपल्याला स्थानिकस्वराज्याचा हक्क मिळावा असे अर्ज जाऊं लागले. हा हक्क मिळविण्यास लोकांना प्रवृत्त करण्याचेसंबंधानें इंडियन असोसिएशनकडून घडलेले परिश्रम अत्यंत स्तुत्य आहेत, ह्यांत संशय नाहीं. व हीं जी सदर

असोसिएशननें कामगिरी केली तिची जितकी तारीफ करावी तितकी थोडीच होणार आहे. हा हक्क संपादनार्थ सर्व लोकांची इच्छा व प्रवृत्ति आहे हें दर्शवि-ण्यासाठीं ह्या देशांत सर्वत्र सभा होऊन सरकाराकडे अर्ज गेले व लार्ड रिपन साहेबांनीं सर्व लोकांचें मत व त्यांची त्या हक्क संपादनाविषयींची बलवत्तर इच्छा बघून त्या हक्काचें हिंदुस्थानच्या प्रजेस दान केलें. सारांश, त्याबद्दलचेंही सर्व यश इंडियनअसोसिएशनकडेच आहे. म्हणजे, ज्याअर्थी त्या असोसिएशनचा जीव आणि आत्मा बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी हे आहेत त्याअर्थीं, तें यश असोसिएश-नकडे आहे असें म्हटलें म्हणजे त्याचे खरे भोक्ते बाबूसाहेबच आहेत हें उघड आहे.

## उपसंहार.

असो. ह्याप्रमाणें बाबू सुरेंद्र-नाथ यांचे आयुश्चरित्रांतल्या अगदीं ठोकळ ठोकळ गोष्टी आम्हीं ह्या चरित्रलेखांत नमूद केल्या आहेत. त्यांचे अनेक विषयांव-रील सुंदर, मनोरम व व्यापक लेख व त्यां-चीं सुश्राव्य भाषणें यांचे मासलेही ह्या चरि-त्रांत गोंवण्याचा आमचा विचार होता. परंतु तसें करण्यानें हा लेखविस्तार फार होईल म्हणून आम्ही बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी यांचें हें त्रोटक चरित्र येथेंच पुरें करून आमच्या वाचकांस समर्पण करितों. ह्यापासू-न अनेकांस अनेक गोष्टी शिकून घेण्यासारख्या आहेत. त्याप्रमाणें हें चरित्र वाचून, वाचकवर्गांतील कोणाकडूनही, त्यां-जकडून घडलेल्या सर्व गोष्टींचें, जरी नाहीं तरी कांहीं गोष्टींचें, अनुकरण झाल्यास, त्यांतपुढें हें सुचरित्र ठेवल्याचें चीज झालें असें मानण्यास आनंद वाटेल. ईश्वर बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी यांस दीर्घायुरा-रोग्यैश्वर्य देऊन त्यांचेकडून अशीच सर्वदा देशसेवा घडण्याची त्यांस उमेद व इभ्रत ठेवो असें आम्ही इच्छितों.